सेव्हींग व करंट खात्यांवर मिळवा 7% व्याजदर
दि जैन मर्चन्टस् को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.
इमारत कंपनी, पोस्ट ऑफिस जवळ, कापड बाजार, अ.नगर. फोन नं. : 0241-2993900
श्री. संजय काठेड (संस्थापक) Mo. 9372444001






# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा



सुवर्ण विश्वातील सर्वात जूनी.. विश्वसनीय व नामांकित पेढी...
मे. हरी बाकाजी देडगांवकर
Since 1935
सराफ ॲण्ड ज्वेलर्स
२५७१, एम.जी.रोड, कापड बाजार, अहमदनगर.
फोन : २३४६४४३. मो. ९८२२९९१०२४.


रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शनिवार दि. १६.०५.२०२६ | अंक नं. ०३९ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020


22 कॅरेट सोन्याचा सर्वात कमी भाव, सर्वात कमी मजुरी..
दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी ₹ ९९९/-*
2014 पासुन आपल्या सेवेत.. सोनेरी नातं..
चंदुकाका ज्वेल्स™
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
Conditions Apply


# मराठा आरक्षणप्रश्नी मनोज जरांगे पाटील यांचे ३० मेपासून अंतरवाली सराटीत 'बेमुदत उपोषण'

जालना : मराठा आरक्षणप्रश्नी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समाजाची दिशाभूल व फसवणूक केल्याचा आरोप करत मनोज जरांगे यांनी ३० मेपासून अंतरवाली सराटी (ता. अंबड) येथे बेमुदत उपोषणाची घोषणा १६ मे रोजी अंतरवाली सराटी येथे झालेल्या जाहीर बैठकीत केली.

राज्यभरातून मराठा समाजाचे कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते. यावेळी बोलताना जरांगे यांनी शासनासमोर विविध मागण्या मांडत २९ मेपर्यंत मुदत दिली. कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप करावे, सातारा, हैदराबाद आणि इतर संस्थानांचे गॅजेट अध्यादेश लागू करावेत, राज्यातील सर्व सरसकट गुन्हे मागे घ्यावेत, तसेच आंदोलनात बलिदान दिलेल्या युवकांना महावितरण आणि औद्योगिक क्षेत्रात नोकरी देण्यासाठी अध्यादेश काढावा, अशी मागणी त्यांनी केली.



सरकारकडे २९ मेपर्यंतची मुदत आहे. त्यानंतर मागण्यांची अंमलबजावणी झाली नाही, तर ३० मे रोजी बेमुदत उपोषण आणि तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्यावर टीका करताना जरांगे म्हणाले, मुंबईत समाज एकवटला होता, त्या वेळी प्रमाणपत्र देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मग आता आमची प्रमाणपत्रे का रोखली जात आहेत? हैदराबाद गॅजेटनुसार मराठवाड्यातील मराठा बांधवांना तातडीने प्रमाणपत्र द्यावे आणि मराठा समाजाचे मन जिंकावे, असे आवाहन जरांगे यांनी केले आहे.

तसेच राज्यातील ५८ लाख नोंदींना प्रमाणपत्र द्यावे, ग्रामपंचायतीमध्ये नोंदी लिहाव्यात, सातारा संस्थानचा अध्यादेश लागू करावा आणि १९९४ च्या धर्तीवर आरक्षणाचा अध्यादेश काढावा, अशी मागणीही त्यांनी केली.

सारथी संस्थेतील विद्यार्थ्यांच्या रखडलेल्या शिष्यवृत्तीचा मुद्दा उपस्थित करताना जरांगे म्हणाले, महामंडळाचे १६०० ते १८०० कोटी रुपये थकले आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होत आहे. यावेळी त्यांनी गंभीर आरोपही केले. माझ्या विरोधात बोलण्यासाठी काही मंत्र्यांनी एका संघटनेला दोन-दोन कोटी रुपये दिले, असा दावा त्यांनी केला. तसेच नेकनूर येथील सरपंचावर ग्रामपंचायत जाळल्याचा खोटा गुन्हा दाखल करण्यात आल्याचा आरोप करत तो गुन्हा मागे घेण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांनी हस्तक्षेप करावा, अशी मागणी त्यांनी केली.


अकोले तालुक्यातील सुप्रसिद्ध इंद्रायणी तांदूळ मिळेल
ध्येय ॲग्रो 9623576711


## नीट पेपरफुटीचा मुख्य सूत्रधार गजाआड; पी. व्ही. कुलकर्णीला पुण्यातून अटक

पुणे – नीट २०२६ प्रश्नपत्रिका फुटीच्या प्रकरणात केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) मोठी कारवाई केली आहे. या संपूर्ण रॅकेटचा मुख्य सूत्रधार आणि मूळचा लातूरचा असलेला केमिस्ट्रीचा लेक्चरर पी. व्ही. कुलकर्णी याला सीबीआयने पुण्यातून अटक केली आहे. सखोल चौकशीनंतर ही कारवाई करण्यात आल्याचे सीबीआयने स्पष्ट केले आहे. या पेपरफुटी प्रकरणात आतापर्यंत कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे उघड झाले असून सीबीआयने देशभरातून ७ जणांना बेड्या ठोकल्या आहेत.

सीबीआयने दिलेल्या माहितीनुसार, पी. व्ही. कुलकर्णी याचा नॅशनल टेस्टिंग एजन्सीच्या (एनटीए) परीक्षा प्रक्रियेत सहभाग होता. यामुळेच त्याला परीक्षेच्या अत्यंत गोपनीय प्रश्नपत्रिकेपर्यंत पोहोचणे शक्य झाले. एप्रिल २०२६ च्या शेवटच्या आठवड्यात कुलकर्णी याने या प्रकरणातील दुसरी आरोपी मनीषा वाघमारे (अटक: १४ मे) हिच्या मदतीने पुण्यातील आपल्या निवासस्थानी काही विद्यार्थ्यांसाठी विशेष कोचिंग वर्ग घेतले होते. या वर्गांमध्ये त्यांनी थेट प्रश्न, पर्याय आणि त्यांची अचूक उत्तरे विद्यार्थ्यांना लिहून दिली. ३ मे रोजी झालेल्या मुख्य परीक्षेतील प्रश्नपत्रिका या विद्यार्थ्यांच्या वहीतील प्रश्नांशी १०० टक्के जुळत असल्याचे तपासात समोर आले आहे.

## एमआयडीसीतून दीड लाखाच्या साहित्याची चोरी

नगर – एमआयडीसी परिसरातील कंपनीत काम करणाऱ्या मशीन ऑपरेटरनेच कंपनीतील १ लाख ४१ हजार रुपये किंमतीचे ३० किलो कार्बाइड इन्सर्ट चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी एमआयडीसी पोलिस ठाण्यात नवनाथ रामदास जाधव (रा. बोल्हेगाव) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत कंपनीतील कन्सल्टंट इंजिनिअर गौरव सुधीर महाजन (रा. तपोवन रोड, सावेडी) यांनी फिर्याद दिली आहे. त्यांच्या कंपनीत काम करणारा मशीन ऑपरेटरने नवनाथ रामदास जाधव याने ११ मे रोजी सकाळी १० ते १२ मे रोजी सकाळी १० या कालावधीत कंपनीतून १ लाख ४१ हजार रुपये किंमतीचे ३० किलो कार्बाइड इन्सर्ट चोरून नेले. ही बाब निदर्शनास आल्यावर महाजन यांनी १५ मे रोजी एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली असून पोलिसांनी नवनाथ जाधव याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.


मैने सोना खरीद ने को मना किया
आप व्हाईट मेटल की थाली ले सकते है।
खास अधिक मासासाठी
व्हाईट मेटलचे ताट, दिवे, समई, हत्ती, मोर, कासव इ. शो-च्या वस्तू योग्य दरात मिळतील.
BIG PLATE CRYSTAL DIYA
जयश्री क्लॉथ सेंटर
तापीदास गल्ली, रसरंग मिसळशेजारी, अ.नगर.
MO. 8275033165


# इंधन बचतीसाठी सरकारी कर्मचारी दर शुक्रवारी पाळणार नो व्हेईकल डे

नगर – अहिल्यानगर जिल्ह्यातील शासकीय कर्मचाऱ्यांतर्फे इंधन बचतीसाठी दर शुक्रवारी नो व्हेईकल डे पाळण्यात येणार असून, हरित चळवळीसाठी एक कर्मचारी-एक वृक्ष ही मोहिमही राबविण्यात येणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना दिलेला पर्यावरणासाठी जीवनशैली हा संदेश आणि मुख्यमंत्री यांच्या पर्यावरणपूरक धोरणांना प्रतिसाद म्हणून ही मोहीम राबविणार असल्याचे संघटनेने सांगितले.

राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना (अहिल्यानगर शाखा) आणि अहमदनगर डिस्ट्रिक्ट रेव्हेन्यू (महसूल) डिपार्टमेंट क्लास-३ गव्हर्नमेंट सर्व्हन्ट्स असोसिएशन यांच्या संयुक्त पुढाकाराने हरित संकल्पाची घोषणा करण्यात आली आहे. या उपक्रमात इंधनाची बचत करून देशाच्या अर्थव्यवस्थेला हातभार लावण्यासाठी दर शुक्रवारी जिल्ह्यातील सर्व विभागांचे कर्मचारी नो व्हेईकल डे पाळणार आहेत. या दिवशी कर्मचारी स्वतःची खाजगी वाहने घरीच ठेवतील.

### एक कर्मचारी-एक वृक्ष मोहिमही राबविणार

कार्यालयात येण्यासाठी सायकलचा वापर करतील. ज्या कर्मचाऱ्यांना सायकल चालवणे शक्य नाही, ते एसटी बस किंवा रिक्षा यांसारख्या सार्वजनिक वाहतुकीचा वापर करतील किंवा किमान २ ते ३ किलोमीटर अंतरावर असतील तर पायी चालून कार्यालयात येतील.

केवळ वृक्षारोपण करून न थांबता, एक कर्मचारी – एक वृक्ष या संकल्पनेतून जिल्ह्यातील प्रत्येक कर्मचारी एक झाड लावेल किंवा दत्तक घेईल. आपल्या कार्यालय परिसरात किंवा स्वतःच्या तालुक्यात, शहरातील मोकळ्या जागांवर ही झाडे लावून ती जगवण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित कर्मचाऱ्याची असेल. या चळवळीत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या कार्यालयांचा जिल्हा स्तरावर विशेष सन्मान करण्यात येणार आहे.

शासकीय कार्यालयात येणाऱ्या सामान्य जनतेला आपली कागदपत्रे सुरक्षित ठेवण्यासाठी अनेकदा प्लास्टिक पिशव्यांचा वापर करावा लागतो. पर्यावरणाची ही हानी टाळण्यासाठी संघटनेच्या वतीने नागरिकांना मोफत कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात येणार आहे. यामुळे शासकीय कर्मचाऱ्यांची एक संवेदनशील सामाजिक कार्यकर्ता आणि लोकसेवक ही प्रतिमा अधिक उजळण्यास मदत होईल.

वाढता कामाचा व्याप आणि ताणतणाव पाहता, कर्मचाऱ्यांच्या आरोग्यासाठी महिन्यातून एका रविवारी आरोग्य रॅली किंवा ट्रेकिंगचे आयोजन केले जाईल. तसेच कर्मचाऱ्यांचे मानसिक स्वास्थ्य जपण्यासाठी आणि कार्यक्षमता वाढवण्यासाठी सुदर्शन क्रिया, ध्यानधारणा, योग आणि प्राणायाम यांची विशेष सत्रे आयोजित करण्याचा संघटनेचा मनोदय आहे.

उपक्रम यशस्वीतेसाठी मध्यवर्ती कर्मचारी संघटनेचे उपाध्यक्ष अशोक मासाळ, सरचिटणीस रावसाहेब निमसे, अध्यक्ष सुभाष तळेकर यांच्यासह सर्व विभागातील पदाधिकारी व कर्मचारी पूर्ण ताकदीनिशी प्रयत्नशील असल्याचे सांगण्यात आले.


निर्व्यसनी बदली ड्रायव्हर मिळेल
9021406640

पेस्ट कंट्रोल
झुरळ, ढेकूण, मुंग्या, उंदिर, कोळी, वाळवी, पाली, मच्छर व किडेसाठी
फॉगींग करून मिळेल.
9272424705
7276423997

३०० स्के.फू. रोडटच दुकान भाड्याने देणे
नवीपेठ मध्ये, नवीन मराठी शाळे समोर, रोडटच दुकान भाडयाने देणे
7350012310
8888965980

महेंद्र पेढावाला
रजवाडी गुजराती थाळी
पार्सल सुविधा उपलब्ध..
किटी पार्टी व बर्थडे पार्टीसाठी खास सोय..
कापड बाजार, अहिल्यानगर.
दर रविवारी दालबाटी स्पे. आमरस





Starts @ For 4 nights 5 Days 16800/-
Packages Available 5D, 6D, 7D...
Namoh Since 1981 A Total Travel Solution...
For details contact : 73505 30009 | 73505 40009 | 73505 50009
www.namohtours.com
Ticket Bookings | Hotel Bookings | International & Domestic Tours | Railway Tours | Customized Tours | Corporate Tours | Group Tours | MICE | Insurance | Passport/Visa



कृपया जवळच्या किराणा ड्रायफ्रुट दुकानदारांना संपर्क करा
रत्नकमल™ चहा
10 किलो मागे 1 मोठी पिशवी फ्री..फ्री..
ब्रॅंडेड कंपनीचा चहा व रत्नकमल चहा एक वेळेस जरूर तुलना करुन पहा
आशिष ट्रेडर्स चहा पावडरचे ठोक व किरकोळ विक्रेते
रत्नकमल, बुरुड गल्ली, मारुती मंदिरासमोर, अहिल्यानगर- ४१४००१
Contact : 8767369367
इतर कंपन्या पेक्षा 50 ते 70 रुपये कमी किलो मागे स्वस्त दर्जा त्यापेक्षाही उत्तम.

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

# अहिल्यानगर शहर व उपनगरातील वीजपुरवठा वारंवार होत आहे खंडित

## दोन ते तीन महिन्यांपासून पाणीपुरवठा पूर्णपणे विस्कळीत, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी लक्ष घालावे

नगर – अहिल्यानगर शहर व उपनगरातील वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याने गेल्या दोन ते तीन महिन्यांपासून पाणीपुरवठा पूर्णपणे विस्कळीत झाला आहे. ऐन उन्हाळ्यात नागरिकांना मुबलक पाणी साठा असूनही पिण्याच्या पाण्यासाठी हाल सहन करावे लागत आहे. तरी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी याबाबत लक्ष घालावे व वीज पुरवठा सुरळीत करण्याबाबत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांना, कर्मचाऱ्यांना आदेश द्यावे, अशी मागणी निवेदनाद्वारे भाजपाच्या नगरसेवकांनी केली आहे.



अहिल्यानगर शहर उपनगरातील खंडित वीजपुरवठा बाबत भाजपाच्या नगरसेवकांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना निवेदन दिले. याप्रसंगी निखिल वारे, उपमहापौर धनंजय जाधव, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, नगरसेवक अनिल बोरुडे, महेश लोंढे, रवि बारस्कर, विशाल नाकाडे, सुजय मोहिते, अनिल ढवण, पुष्कर कुलकर्णी, सतीश शिंदे, रोहन सानप, अजय ढोणे आदी उपस्थित होते (छाया – विजय मते)

याबाबत भाजपाचे जिल्हा महामंत्री व नगरसेवक निखिल वारे यांनी ना. विखे यांना निवेदन दिले आहे. यावेळी उपमहापौर धनंजय जाधव, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, नगरसेवक अनिल बोरुडे, महेश लोंढे, सतीश शिंदे, रवी बारस्कर, विशाल नाकाडे, करण कराळे, सुजय मोहिते, अजय ढोणे, रोहन सानप, अनिल ढवण, पुष्कर कुलकर्णी उपस्थित होते.

निवेदनात म्हटले की अहिल्यानगर शहर व उपनगरातील पाणीपुरवठा गेल्या २ ते ३ महिन्यांपासुन पुर्णपणे विस्कळीत झालेला आहे. सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे नागरिकांना पिण्याच्या पाण्याची जादा प्रमाणात आवश्यकता असते. अहिल्यानगर शहर व उपनगरामधील विजपुरवठा वारंवार खंडीत होत असलेबाबत. महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीकडुन अहिल्यानगर शहर व उपनगर तसेच वसंत टेकडी येथील विजपुरवठा वारंवार खंडीत केला जातो, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीच्या संबंधित अधिका–यांच्या तसेच कर्मचा–यांच्या भ्रमणध्वनीवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता ते लवकर फोन उचलत नाहीत अथवा फोन उचलल्यानंतर उडवाउडवीची उत्तरे देतात. महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीचा सावळागोंधळ, अचानकपणे विजपुरवठा खंडीत करणे या कारणांमुळे नागरिकांना पुरेशा प्रमाणात व वेळेवर पाणीपुरवठा केला जात नसल्यामुळे प्रभागातील नागरिक अक्षरशः वैतागलेले आहेत. यामुळे नाहक महानगरपालिके विषयी नागरिकांच्या मनात तीव्र नाराजी व्यक्त होत असुन विनाकारण प्रभागातील नगरसेवकांना नागरिकांच्या रोषास सामोरे जावे लागत आहे. विजपुरवठा वारंवार खंडीत होत असल्यामुळे व्यावसासिक व उद्योजकांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत असलेबाबत. सध्या उन्हाळयाचे दिवस असल्यामुळे शहर व उपनगरांमध्ये छोटे मोठे व्यावसायिक आईस्क्रीम, लस्सी, थंडपेय अशा विविध प्रकारचे व्यवसाय करीत असतात परंतु विजपुरवठा वारंवार खंडीत होत असल्यामुळे या व्यावसायिकांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे.

रात्री अपरात्री विजपुरवठा खंडीत होत असलेबाबत अनेक ज्येष्ठ नागरिक व महिलांना वयोमानानुसार उच्च रक्तदाबाचा त्रास असल्यामुळे रात्री अपरात्री विजपुरवठा खंडीत झाल्यानंतर उष्णतेमुळे त्यांना श्वास घेण्यास त्रास होतो. तसेच लहान मुलांनाही विज खंडीत झाल्यामुळे झोपेच्या त्रासास सामोरे जावे लागत आहे.

अहिल्यानगर शहर व उपनगरातील वारंवार खंडीत होणारा विजपुरवठा सुरळीत करणेकरीता महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीच्या संबंधित अधिका–यांना व कर्मचाऱ्यांना योग्य ते आदेश देण्यात यावेत अशी मागणी या निवेदनात केली आहे.

# गुंतवणूक वाढते आहे पण दिशा ठरली आहे का?

काही दिवसांपूर्वी एक व्यक्ती भेटायला आले होते. अनेक वर्षांपासून केलेल्या गुंतवणुकींची यादी त्यांनी समोर ठेवली. म्युच्युअल फंड, विमा योजना, ठेवी, काही शेअर्स आणि वेगवेगळ्या काळात सुरू केलेल्या योजना. सगळं शांतपणे पाहिल्यानंतर ते एक वाक्य बोलले – गुंतवणूक तर खूप वर्षांपासून करतोय, पण खरंच पुढे जातोय की नाही, हेच समजत नाही.



राजन कुटे

कदाचित आज अनेक गुंतवणूकदारांची हीच अवस्था आहे.

आज लोक गुंतवणूक टाळत नाहीत. उलट पूर्वीपेक्षा जास्त गुंतवणूक करत आहेत. पण अनेक वेळा त्या गुंतवणुकींमागे एक स्पष्ट दिशा नसते. एखादी योजना करबचतीसाठी घेतलेली असते, एखादी बाजार चांगला चालू असल्यामुळे, एखादी कुणाच्या सल्ल्याने, तर एखादी त्या वेळेला सुरक्षित वाटली म्हणून.

कालांतराने पोर्टफोलिओ वाढत जातो. पण स्पष्टता मात्र तितकी वाढत नाही.

इथेच उद्दिष्टांचं महत्त्व शांतपणे समोर येतं. केवळ आर्थिक नियोजनाचा भाग म्हणून नव्हे, तर पैशाला अर्थ देण्यासाठी. कारण जेव्हा गुंतवणूक आयुष्याशी जोडलेली नसते, तेव्हा आर्थिक हालचाल सुरू असली तरी आत्मविश्वास निर्माण होत नाही.

खरंतर अनेक महत्त्वाची उद्दिष्टं खूप साधी असतात. निवृत्तीनंतर आर्थिकदृष्ट्या दुसऱ्यांवर अवलंबून राहावं लागू नये, मुलांच्या शिक्षणासाठी अडचण निर्माण होऊ नये, अनिश्चित काळातही मनात शांतता असावी – या गोष्टी वरवर साध्या वाटतात, पण अनेक दशकांतील आर्थिक निर्णय शांतपणे घडवत असतात.

गुंतवणूक उद्दिष्टांशी जोडली गेली की आणखी एक बदल घडतो. बाजारातील तात्पुरती घसरण थोडी कमी भयावह वाटू लागते. संयम राखणं सोपं होतं. प्रत्येक घसरण अपयश वाटेनाशी होते, कारण लक्ष रोजच्या चढउतारांवरून दीर्घकालीन उद्देशाकडे वळू लागतं. अनेक वेळा खरी समस्या परताव्याची नसते; ती विसंगतीची असते. लोक मेहनत करतात, नियमित बचत करतात, प्रामाणिकपणे गुंतवणूक करतात, पण हे सगळं एकाच दिशेने चाललं आहे का, हा प्रश्न विचारण्यासाठी थांबत नाहीत.

अर्थपूर्ण संपत्ती निर्माण करणं हे प्रत्येक नवीन संधीच्या मागे धावून होत नाही. ते बहुतेक वेळा शांतपणे घडतं – सातत्य, संयम आणि काही स्पष्ट प्राधान्यांशी दीर्घकाळ जोडून राहिल्याने.

काही टप्प्यावर प्रत्येक गुंतवणूकदाराने स्वतःला एक साधा प्रश्न विचारण्याची गरज असते – माझ्या गुंतवणुकी वाढत आहेत का एवढंच नाही, तर त्या मला खरंच ज्या आयुष्याकडे जायचं आहे, तिकडे घेऊन जात आहेत का?

– **राजन कुटे,** अँफी नोंदणीकृत म्युच्यूअल फंड वितरक
मो. ९४०३३७४६७४ /९४२३७०८६७०

# डिजिटल जनगणनेसाठी महापालिका सज्ज

### आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडून प्रगणक व पर्यवेक्षकांना मार्गदर्शन



नगर– देशात होत डिजिटल जनगणनेसाठी अहिल्यानगर महापालिका सज्ज झाली आहे. जनगणना प्रक्रियेचे महत्त्व, माहिती संकलनाची अचूक पद्धत आणि नागरिकांशी संवाद कसा साधावा, यासह सर्व तांत्रिक बाबींवर मनपा कर्मचाऱ्यांना सविस्तर प्रशिक्षण देण्यात येत आहे, असे प्रतिपादन मुख्य जनगणना अधिकारी तथा मनपा आयुक्त यशवंत डांगे यांनी केले.महापालिकेच्या जिजाम ाता सभागृहात आयोजित विशेष बैठकीत प्रगणक (माहिती संकलक) आणि पर्यवेक्षक यांना जनगणनेच्या पहिल्या टप्प्याबाबत घरगणना करण्याबाबत अत्यंत महत्त्वाच्या मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या, त्याप्रसंगी आयुक्त बोलत होते. या बैठकीला सहाय्यक आयुक्त मेहेर लहारे, उपायुक्त शहाजान तडवी, जनगणना शहर विभाग प्रमुख राकेश कोतकर, ब्रँड अँबेसिडर डॉ. अमोल बागुल, प्रभाग अधिकारी बाळासाहेब पवार, श्याम गोडळकर आणि आजीम शेख आदी उपस्थित होते.

या डिजिटल जनगणनेसाठी प्रभाग अधिकारी, तांत्रिक बाबींसाठीचे तंत्रज्ञ, एचएलओ ॲप बद्दलची माहिती व सराव, तसेच डिजिटल नकाशा बनवणे आदी घटकांबद्दल प्रगणकांना विशेष कौशल्य प्रदान करण्यात येत आहे. १६ मे ते १४ जून या एक महिन्याच्या कालावधीमध्ये कोणत्या टप्प्यावर किती टक्के काम पूर्ण झाले पाहिजे, याचे वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे. तसेच प्रगणकांना दिले जाणारे जनगणना किट, मोबाईल प हाताळताना येणाऱ्या तांत्रिक अडचणी आणि स्वगणना तपशील या सर्व घटकांवर आयुक्त यशवंत डांगे यांनी सखोल मार्गदर्शन केले.

डिजिटल जनगणनेचा हा टप्पा वेळेत आणि अचूकपणे पार पाडण्यासाठी शहरातील सर्व प्रभागांतील नियुक्त प्रगणक आणि पर्यवेक्षकांची मोठी लगबग सुरू आहे. प्रत्यक्ष क्षेत्रीय कामाला सुरुवात होत असताना आवश्यक असणारे साहित्य, ओळखपत्रे आणि तांत्रिक प्लिकेशनची तपासणी करून सर्व प्रगणक घरोघरी जाण्यासाठी सज्ज झाले आहेत.

# घरगणनेला प्रारंभ; प्रगणक करणार माहिती संकलन


नगर – बहुप्रतीक्षित भारताची जनगणना २०२७ प्रक्रियेला १६ मेपासून अधिकृत सुरुवात झाली असून, महाराष्ट्रात घरगणनेच्या पहिल्या टप्प्याची अंमलबजावणी १६ मे ते १४ जून या कालावधीत केली जाणार आहे. घरांची यादी व घरगणना या टप्प्याअंतर्गत नियुक्त प्रगणक नागरिकांच्या घरोघरी जाऊन माहिती संकलित करणार आहेत.

या पहिल्या टप्प्यात नागरिकांच्या राहणीमानाचा दर्जा तसेच मूलभूत सुविधांची उपलब्धता याबाबत माहिती संकलित केली जाणार आहे. प्रगणकांकडून घराचा प्रकार, घरासंबंधीची सविस्तर माहिती, पिण्याच्या पाण्याचा मुख्य स्त्रोत, प्रकाश व्यवस्था, शौचालयाचा प्रकार, घरातील दोनचाकी व चारचाकी वाहने, संगणक, लॅपटॉप तसेच इंटरनेट सुविधेची उपलब्धता आदी बाबींविषयी प्रश्न विचारले जाणार आहेत.

जनगणना ही देशाच्या विकासात्मक धोरणांचा पाया मानली जात असल्याने नागरिकांनी अचूक माहिती देऊन सहकार्य करणे आवश्यक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. भविष्यातील शासकीय योजना, सुविधा व लोकसंख्याविषयक धोरणे निश्चित करण्यासाठी जनगणनेतील माहिती महत्त्वाची ठरणार आहे.

दरम्यान, अहिल्यानगर महानगरपालिकेने नागरिकांना घरगणनेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविण्याचे आवाहन केले आहे. नागरिकांनी जनगणना २०२७ अंतर्गत होणाऱ्या घरगणनेत सहकार्य करून आपल्या कुटुंबाची व घराची संपूर्ण व अचूक माहिती द्यावी. जबाबदार नागरिकत्वाची ओळख निर्माण करण्यासाठी या राष्ट्रीय कार्यात सक्रिय सहभाग आवश्यक आहे, असे आवाहन उपायुक्तांनी केले आहे.

# चंपालाल मुथ्था यांचे दु:खद निधन



नगर – पुनममोतीनगर येथील रहिवासी व मोची गल्ली येथील ‘वर्धमान’चे चंपालाल लालचंद मुथ्था (ओढनावाला, वय ८७) यांचे १५ मे रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर १६ मे रोजी नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे १ मुलगा, ३ मुली, सुन, जावई, १ भाऊ, भावजया असा परिवार आहे. इंद्रकुमार मुथ्था यांचे भाऊ, विजय मुथ्था यांचे वडील तर पियुष व दिपेश यांचे ते आजोबा होत.

# कोतवाली पोलिस ठाण्यात तक्रार निवारण दिनाला प्रतिसाद

### वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत १७५ पैकी ७६ अर्जांची जागेवर निर्गती



कोतवाली पोलिस ठाण्यात आयोजित तक्रार निवारण दिनात नागरिकांशी संवाद साधताना पोलिस उपअधिक्षक डॉ. दिलीप टिपरसे, पो.नि. संभाजी गायकवाड, महिला स. पो. नि. तेजश्री थोरात.

नगर – जिल्ह्यातील विविध पोलिस ठाण्यांतर्गत नागरिकांच्या काही तक्रारी, समस्या असल्यास त्याचे निवारण होऊन नागरिकांचा वेळ वाचावा व सोशल पोलिसिंगच्या माध्यमातून जनतेशी संवाद साधता यावा, या उद्देशाने प्रत्येक शनिवारी जिल्ह्यातील सर्व पोलिस ठाण्यांमध्ये नागरिकांसाठी तक्रार निवारण दिन आयोजित करण्याचा उपक्रम यापुर्वीपासुन सुरू आहे. या उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे आदेश जिल्हा पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन यांनी दिले आहे. त्यानुसार १६ मे रोजी कोतवाली पोलिस ठाण्यात तक्रार निवारण दिन पार पडला.

या वेळी शहर विभागाचे पोलिस उपअधिक्षक डॉ. दिलीप टिपरसे, कोतवालीचे पो.नि. संभाजी गायकवाड, महिला सहाय्यक पोलिस निरीक्षक तेजश्री थोरात यांनी उपस्थित राहून तक्रारदार नागरिकांशी संवाद साधला. या तक्रार निवारण दिनानिमित्ताने पोलिस ठाण्यात एकूण १७५ तक्रार अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी ७६ अर्जांची जागेवरच निर्गती करण्यात आली. यामध्ये भांडण तंटा, दिवाणी स्वरूपाच्या तक्रारी, तसेच विविध समस्या असलेल्या अर्जांचा समावेश होता. या तक्रार निवारण दिनाला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या विशेष आदेशानुसार, नागरिकांच्या प्रलंबित समस्यांचे जागेवरच निवारण करण्यासाठी कोतवाली पोलिस ठाण्यात प्रत्येक शनिवारी सकाळी ११ ते १ दरम्यान तक्रार निवारण दिनाचे आयोजन करण्यात येत असून नागरिकांनी सदर तक्रार निवारण दिनी उपस्थित राहून आपल्या तक्रारी मांडाव्यात असे आवाहन पोलिसांतर्फे करण्यात आले आहे.

# बालिकाश्रम रस्त्यावर संशयास्पदरित्या फिरणाऱ्या तिघांना हत्यारांसह पकडले

नगर – शहरातील बालिकाश्रम रस्ता परिसरात पहाटेच्या सुमारास संशयास्पदरीत्या फिरत असलेल्या तिघांना तोफखाना पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून धारदार हत्यारे व घरफोडीसाठी वापरले जाणारे साहित्य जप्त करण्यात आले आहे. या प्रकरणी महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १५ मे रोजी पहाटे चिंतामणी हॉस्पिटलसमोर ही कारवाई करण्यात आली.

तोफखाना पोलीस ठाण्याचे कर्मचारी रात्र गस्त घालत होते. त्यावेळी पहाटे २ च्या सुमारास चिंतामणी हॉस्पिटलसमोर. बालिकाश्रम रस्ता परिसरात तीन संशयित व्यक्ती संशयास्पद हालचाली करताना आढळून आल्या. पोलिसांनी त्यांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी समाधानकारक उत्तरे दिली नाहीत. ताब्यात घेण्यात आलेल्यांची नावे आकाश मोहन गाडे (वय २९), विशाल हरी भालेराव (वय २७) आणि संजय बाळु डाके (वय २१, सर्व रा. सारडा कॉलेज मागे, सिध्दार्थनगर, अहिल्यानगर) अशी आहेत.

पोलिसांनी त्यांच्या ताब्यातून व्हेक्स ब्लेड असलेली करवत, स्क्रू ड्रायव्हर, कटर तसेच दोन टिकाव असा मुद्देमाल जप्त केला आहे. सदर साहित्य हे मालमत्तेविरूध्द गुन्हा करण्याच्या उद्देशाने बाळगल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, संशयित आरोपी हे सूर्यास्त ते सूर्योदय दरम्यान स्वतःचे अस्तित्व लपवून फिरत असल्याचेही पोलिसांच्या फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी पोलीस अंमलदार बाळासाहेब भापसे यांनी फिर्याद दिली आहे. पोलीस अंमलदार शिंदे पुढील तपास करीत आहेत.

# अंबादास (अशोक) पा.लबडे यांचे ह्दयविकाराने निधन



श्रीरामपूर – येथील शेतकरी अंबादास (अशोक) कारभारी पा.लबडे (वय ५४) यांचे १५ मे रोजी सायं. ५ वा. ह्दयविकाराने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन विवाहित मुली, दोन बहिणी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. चि.युवराज लबडे यांचे वडील, नगरसेवक मनोज लबडे यांचे चुलत बंधू होत.

# ज्ञानेश्वर पांडुळे यांचे दु:खद निधन



नगर – चिचोंडी पाटील येथील रहिवासी ज्ञानेश्वर अंबादास पांडुळे (वय ३८) यांचे १५ मे रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर चिचोंडी पाटील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, पत्नी, १ मुलगा, २ मुली असा परिवार आहे.

# जुन्या वादातून डोक्यात दगड घालून तरुणाला जीवे मारण्याची धमकी

नगर – भिंगार परिसरात असलेल्या वडारवाडी येथे जुन्या भांडणाच्या कारणावरून एका तरुणाला बेदम मारहाण करण्यात आल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी डिक्या टिपावत काळे याच्या विरोधात भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शौर्य विलास चव्हाण या २५ वर्षीय तरुणाने यासंदर्भात फिर्याद दिली आहे.

फिर्यादी शौर्य चव्हाण हा मजुरी काम करतो. १५ मे रोजी सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास तो वडारवाडी परिसरात असताना आरोपी डिक्या काळे याने त्याला गाठले. यावेळी दोघांमध्ये जुन्या वादातून पुन्हा बाचाबाची झाली. रागाच्या भरात आरोपीने फिर्यादीला विनाकारण अश्लील भाषेत शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. वाद इतका वाढला की, आरोपीने जवळच असलेला दगड हातात घेऊन शौर्यच्या डोक्यात मारला, ज्यामध्ये तो जखमी झाला आहे.

मारहाण केल्यानंतर आरोपीने शौर्यला जीवे मारण्याची धमकीही दिली. या घटनेनंतर जखमी शौर्यने जिल्हा रुग्णालयात जावून उपचार घेतले आणि त्यानंतर पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली. पोलिसांनी या प्रकरणी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# निर्मलनगर परिसरात हळदीच्या कार्यक्रमानंतर वाद; घरात घुसून एकाला लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण

नगर –शहरातील निर्मलनगर परिसरामध्ये हळदीच्या कार्यक्रमानंतर जुन्या वादातून एकाला घरात घुसून लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात चौघांसह इतर पाच ते दहा जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत किरण विष्णू तांबे (वय ४५, रा. हर्षदा पार्क, निर्मलनगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी किरण तांबे हे गोविंद राम इंगळे यांच्याकडील हळदीचा कार्यक्रम संपवून आपल्या घराच्या प्रवेशद्वाराजवळ आले होते. त्यावेळी आरोपी गोविंद राम इंगळे, गोपाल राम इंगळे, जय चंद्रकांत इंगळे आणि गणेश राम इंगळे यांनी त्यांच्या इतर पाच ते दहा नातेवाईक व मित्रांसह तांबे यांच्या घरात अनाधिकृतपणे प्रवेश केला.

सर्व आरोपींनी फिर्यादी यांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यानंतर आरोपींनी त्यांना लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. यावेळी घरातील सदस्यांना बाजूला ढकलून देण्यात आले, ज्यामध्ये फिर्यादी यांच्या मुलीचा चष्मा फुटून नुकसान झाले. घटनेनंतर जखमींना तातडीने जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. या प्रकरणी तोफखाना पोलिसांनी गुन्हा नोंदवला असून, पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक योगेश चाहेर पुढील तपास करत आहेत.

# दिगंबर मानकर यांचे दु:खद निधन



श्रीरामपूर – लक्ष्मीनगर, दळवी वस्ती, वॉर्ड क्र.७ मोरगे हॉस्पिटल जवळील रहिवासी दिगंबर मुरलीधर मानकर (वय ६७) याचे १५ मे रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर श्रीरामपूर अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे १ मुलगा, १ मुलगी, २ भाऊ, भावजया, सुन, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. संजय व राजेंद्र मानकर यांचे ते थोरले बंधू, विक्रम मानकर यांचे वडील तर मयूर मानकर यांचे चुलते होत.

# मंडाबाई हजारे यांचे ह्दयविकाराने निधन



नगर – चिचोंडी पाटील येथील रहिवासी मंडाबाई धर्माजी हजारे (वय ७५) यांचे १६ मे रोजी ह्दयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर चिचोंडी पाटील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. अमृत, संदीप, माणिक हजारे यांच्या त्या मातोश्री होत.

# आंब्याच्या वादातून दिव्यांग महिलेसह पतीला मारहाण

### दिल्लीगेट परिसरातील घटना, तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

नगर – शहरातील दिल्लीगेट परिसरातील सातभाई मळा येथे आंब्याच्या झाडाच्या देखरेखीच्या कारणावरुन एका दिव्यांग महिलेला आणि त्यांच्या पतीला लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत शीतल निलेश कडवा (रा. सातभाई मळा, दिल्लीगेट) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी महिला ही आपल्या कुटुंबासह दिल्लीगेट परिसरात वास्तव्यास आहे. त्यांच्या घराशेजारी असलेल्या एका मोकळ्या जागेची आणि त्यातील आंब्याच्या झाडाची जबाबदारी संबंधित मालकाने फिर्यादी महिलेच्या कुटुंबावर सोपवली आहे. १५ मे रोजी सकाळी साडेअकरा वाजेच्या सुमारास परिसरातीलच गणेश बापू काकडे हा झाडाचे आंबे घेऊन जात असताना फिर्यादी महिलेने त्याला हटकले. याचा राग आल्याने त्या तरुणाने महिलेच्या दिव्यांगत्वाचा अपमान करत अश्लील शिवीगाळ करण्यास सुरुवात केली.

भांडणाचा आवाज ऐकून महिलेचे पती मध्यस्थी करण्यासाठी आले असता, संबंधित त्याने त्यांनाही मारहाण केली. यावेळी पीडित महिला पतीला सोडवण्यासाठी गेली असता आरोपीने धक्काबुक्की केली, ज्यात त्या खाली पडल्या आणि त्यांच्या पायाला दुखापत झाली. यावेळी उपस्थित असलेले आरोपीचे नातेवाईक दत्तात्रय बनकर व अंबिका बनकर यांनी भांडण सोडवण्याऐवजी मारहाण करणाऱ्याला प्रोत्साहन दिले असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे.या तक्रारीवरून पोलिसांनी तिघांच्या विरुद्ध मारहाण आणि धमकावल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

दरम्यान गणेश बापू काकडे यानेही फिर्याद दिली असून आंब्याच्या झाडाखाली पडलेली कैरी उचलली म्हणून निलेश मोतीलाल कडवा व त्याच्या पत्नीने शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी आणि बोथट वस्तूने मारहाण केल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे. तसेच तुमचा गोठा जाळून टाकू आणि तुमच्यावर खोट्या केसेस दाखल करू, अशी धमकीही यावेळी दिली. या फिर्यादी वरून पोलिसांनी दोघांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### त्वचा घट्ट करण्यासाठी

आपली त्वचा सुंदर आणि तरुण राहावी अशी प्रत्येकाची इच्छा असते, परंतु अनेक वेळा वयाच्या आधी त्वचा सैल होऊ लागते. आजकाल जीवनशैली आणि वाढत्या प्रदूषणामुळे त्वचा सैल होऊ लागते. त्वचा घट्ट ठेवण्यासाठी तुम्ही तुमच्या आहारात टोमॅटोचाही समावेश करू शकता. वास्तविक, टोमॅटोमध्ये लाइकोपीन असते, जे एक अँटिऑक्सिडेंट आहे. ते तुमची त्वचा गुळगुळीत ठेवण्यास मदत करू शकते. यासाठी टोमॅटोचे सेवन सॅलड, साइड डिश, सँडविच इत्यादी स्वरूपात करता येते. चॉकलेट (विशेषत: गडद चॉकलेट) मध्ये फ्लेव्हनॉल असतात, जे त्वचेचा खडबडीत पोत कमी करून हानिकारक सूर्यप्रकाशापासून संरक्षण करू शकतात. अशा परिस्थितीत, घट्ट त्वचेसाठी तुम्ही तुमच्या आहारात चॉकलेटचा समावेश करू शकता, परंतु ते ६०% ते ७०% कोकोपासून बनलेले आहे याची खात्री करा.

## पाककला

### नवरत्न कोरमा

**साहित्य** : गाजर, मटार, फरसबी, फुलकोबी, पनीर, कांदे, टोमॅटो, काजू, आले-लसूण पेस्ट, क्रीम, हळद, लाल तिखट, गरम मसाला, मीठ, साखर, तेल किंवा तूप, ड्रायफ्रूट्स आणि डाळिंब दाणे.

**कृती** : प्रथम सर्व भाज्या हलक्या उकडून घ्या. कांदा, टोमॅटो आणि काजू परतून त्याची बारीक पेस्ट तयार करा. कढईत तेल गरम करून आले-लसूण पेस्ट परता. त्यात तयार पेस्ट घालून तेल सुटेपर्यंत शिजवा. आता हळद, तिखट, गरम मसाला, मीठ आणि साखर घालून मसाला तयार करा. त्यात उकडलेल्या भाज्या आणि पनीर घालून मिसळा. थोडे पाणी घालून काही मिनिटे शिजवा. शेवटी क्रीम घालून गॅस बंद करा आणि वरून ड्रायफ्रूट्स व डाळिंब दाणे घालून सर्व्ह करा.

## वास्तू

### स्वयंपाकघरासंबंधी

* स्वयंपाकघर आग्नेय दिशेत असणे चांगले मानले जाते. स्वयंपाक करताना पूर्वेकडे तोंड असेल तर अधिक शुभ मानले जाते.

* दक्षिण दिशेला डोके करून झोपल्याने शांत झोप लागते आणि आरोग्य चांगले राहते असे मानले जाते.

* तुटलेले आरसे, घड्याळे किंवा खराब इलेक्ट्रॉनिक वस्तू नकारात्मक ऊर्जा वाढवतात असे मानले जाते.

* घरात नैसर्गिक प्रकाश येऊ द्या. सकाळचा सूर्यप्रकाश घरात येणे शुभ मानले जाते. त्यामुळे घर प्रसन्न राहते.

* घराच्या अंगणात किंवा बाल्कनीत तुळशीचे रोप लावल्याने सकारात्मक वातावरण राहते.

## सौंदर्य

* कोरफडीचा गर त्वचेसाठी अतिशय उपयुक्त आहे. तो त्वचेला थंडावा देतो तसेच पिंपल्स आणि डाग कमी करण्यास मदत करतो. गुलाबपाणी वापरल्याने चेहऱ्यावर ताजेपणा टिकून राहतो.

* सुंदर केस व्यक्तिमत्त्व अधिक आकर्षक बनवतात. आठवड्यातून किमान दोन वेळा तेलाने मालिश करावी. नारळ तेल, आवळा तेल किंवा बदाम तेल केसांसाठी फायदेशीर असते.

## सल्ला

* बटाटे लवकर उकडण्यासाठी पाण्यात चिमूटभर मीठ घाला.

* हिरवी मिरची टिकवण्यासाठी मिरचीचे देठ काढून डब्यात टिश्यू पेपरसोबत ठेवा.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

रविवार, दि. १७ मे २०२६

**दशहरारंभ, करिदिन, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, अधिक ज्येष्ठ शुक्लपक्ष, कृत्तिका १४।३२, सूर्योदय ०६ वा. २७ मि. सूर्यास्त ०५ वा. २८ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : नवीन मित्रांच्या ओळखी होतील. भविष्यात त्यांचा उपयोग होईल. सरकारी कामे सफल होतील.

**वृषभ** : आपल्या सहकार्यांबरोबर झालेल्या मतभेदांचे निराकरण करण्याचा प्रयत्न करा. अधिकार क्षेत्रात वाढ होईल.

**मिथुन** : मोठ्यांचा सहवास लाभेल, त्यांना भेटून आनंद होईल. दूर किंवा विदेशात असलेल्या संततीच्या शुभवार्ता मिळतील.

**कर्क** : विशेषतः धंदा-व्यवसाय करणाऱ्यांना आज फारच लाभदायक दिवस आहे. मित्राच्या भेटीतून आनंद मिळेल. अजीर्णचा त्रास संभवतो.

**सिंह** : भेटीचे योग येतील. अचानक धनलाभ संभवतो. प्रवास होतील. काम करायला उत्साह वाटणार नाही.

**कन्या** : रागावर आज संयम ठेवावा लागेल. खर्च अधिक होईल. कुटुंबियांबरोबर संघर्ष होणार नाही याकडे लक्ष द्या. कौटुंबिक वातावरण त्रासदायक राहील.

**तूळ** : आज नवीन कामे सुरू करू नका. नवे परिचय सुद्धा लाभदायी होणार नाहीत.

**वृश्चिक** : शारीरिक व मानसिक स्वास्थ्य लाभेल. आर्थिक लाभ होईल. आजारी व्यक्तीच्या प्रकृतीत सुधारणा होईल.

**धनु** : प्रतिस्पर्ध्यांवर विजय मिळवाल. चर्चा- वादविवाद यातही तुमचा प्रभाव राहील. कष्टाच्या मानाने यश संतोषजनक नसेल.

**मकर** : हा वेळ आपल्या एखाद्या आवडीच्या व्यक्तीबरोबर घालवू शकता. आपल्या सर्जनशील व कलात्मक वैशिष्ट्यांना प्रेरणा मिळेल.

**कुंभ** : आपल्या जुन्या लोकांना किंवा आधार देणाऱ्या मित्रांना जोडणे यावेळी आपल्यासाठी फलदायी आहे.

**मीन** : जोखिम असलेल्या कार्यांमध्ये गुंतवणूक करू नये. राजकीय विषयांमध्ये स्थिती सुखद राहील.

## शब्दगंध क्र. ७४३१

सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | | ४ | ५ | ■ |
| | ■ | ६ | | ■ | ७ | | ८ |
| ९ | १० | ■ | | ■ | ११ | | |
| १२ | | १३ | | १४ | ■ | १५ | |
| १६ | | | ■ | १७ | १८ | ■ | |
| ■ | ■ | ■ | १९ | | | २० | ■ |
| २१ | २२ | | | ■ | २३ | | २४ |
| २५ | | ■ | २६ | | | ■ | |

**आडवे शब्द :-** १) भारताचे एक माजी पंतप्रधान ६) आजच्या आदला दिवस ७) सूत कातण्याचे चक्र ९) ज्यावर भाकरी, पोळी वगैरे भाजली जाते ते धातूचे पसरट पात्र ११) आपले काम यशस्वी व्हावे म्हणून देवाला केलेली प्रार्थना व ते यशस्वी झाल्यावर काही तरी देवाला अर्पण करण्याची केलेली प्रतिज्ञा १२) टापटीप; साफसूफ १५) नेहमी; हमेशा १६) बेचव; अळणी; पाणचट १७) मृत्यूचा देव १९) चिरणारे; फाडणारे २१) एकसारखे लक्ष लावून; चकितपणाने २३) बांबू; वेळू २५) फळ, ऊस वगैरेतील द्रव २६) युक्त; सहित; एकत्र

**उभे शब्द :-** १) मदत करणारा; साह्य करणारा २) वाव; संधी ३) नीच मनोवृत्तीचा ४) सडा; शेतीला पाणी देण्याची प्रक्रिया ५) उशिरा पिकणारे धान्य ८) लोकसभा किंवा राज्यसभेचा सभासद १०) वितरण; वाटणी १३) प्रामाणिक; सरळ; चांगला १४) विधी; नियम; लॉ १८) एक प्रकारचे रत्न १९) वाढ; वृद्धी; प्रगती; डेव्हलपमेंट २०) तीव्र उठणारी वेदना; सणक; तिडीक २१) उपहास; फजिती; हुर्यो २२) परीक्षा; चाचणी; सत्त्व २४) मेहनत; श्रम

### शब्दगंध क्र. ७४३० चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| स | म | ज | दा | र | ■ | ■ | प |
| म | द | त | ■ | ख | ट | प | ट |
| त | ■ | न | ■ | वा | र | क | री |
| ल | ता | ■ | स | ल | ■ | ड | ■ |
| ■ | ब | ■ | व | दा | म | ■ | आ |
| स | ड | ■ | व | र | ज | ■ | र |
| हा | तो | डा | ■ | ■ | बू | ■ | मा |
| रा | ब | ■ | सं | त | त | धा | र |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार** : चांगले विचार आणि चांगली माणसं आयुष्य सुंदर बनवतात.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### शिंकताना डोळे बंद का होतात?

आपल्याला शिंक आल्यावर आपसूकच आपले डोळे बंद होतात आपण कधी हा विचार केला आहे की असं का होत,चला मग जाणून घेऊ या.

खरं तर डोळे उघडून शिंकणे कठीणच आहे. आपण प्रयत्न करून देखील असं करू शकत नाही. हे अशक्यच आहे असं म्हणू शकतो.शिंकताना डोळे बंद होतातच . त्या मागील कारण असे की जेव्हा आपल्या नाकात एखादे धुळीचे कण अडकतात तेव्हा आपले मेंदू आपल्या फुफ्फुसांना ते धुळीचे कण बाहेर काढण्याचा संदेश देतात.ते कण बाहेर काढण्यासाठी आपल्या फुफ्फुसांना जास्त प्रमाणात हवा बाहेर फेकावी लागते जी आपल्या नर्व्ह म्हणजे डोळे, चेहरा, तोंड आणि नाकाला नियंत्रित करते. हा संदेश त्या नर्व्ह ला मिळतो आणि शिंक येते आणि शिंकताना अपसुख आपले डोळे बंद होतात.

### सुवर्ण हंस

एका गावात एक गरीब विधवा स्त्री आपल्या दोन मुलींसोबत राहत होती. त्यांची परिस्थिती खूप कठीण होती. रोज मेहनत करूनही त्यांना पुरेसे अन्न मिळत नसे. तरीही त्या तिघी प्रामाणिकपणे आणि प्रेमाने जीवन जगत होत्या.

पूर्वजन्मी त्या स्त्रीचा नवरा एक दयाळू आणि चांगला माणूस होता. मृत्यूनंतर त्याचा जन्म एका सुंदर सुवर्ण हंसाच्या रूपात झाला. त्या हंसाच्या अंगावरील प्रत्येक पिसे सोन्याची होती. एके दिवशी त्याला आपल्या पूर्वजन्मातील कुटुंबाची आठवण आली. तो उडत उडत त्या गावात आला.

हंसाने आपल्या पत्नी आणि मुलींची दयनीय अवस्था पाहिली. त्याला खूप वाईट वाटले. त्याने त्यांना मदत करण्याचे ठरवले. तो म्हणाला, घाबरू नका. मी तुम्हाला वेळोवेळी माझे एक सोन्याचे पीस देईन. ते विकून तुम्ही सुखाने जगू शकाल.


त्या दिवसापासून हंस अधूनमधून येऊन एक सोन्याचे पीस देत असे. त्या पिसांमुळे घरातील गरिबी कमी होऊ लागली. मुली आनंदाने राहू लागल्या. पण काही दिवसांनी त्या स्त्रीच्या मनात लोभ निर्माण झाला. ती विचार करू लागली, हा हंस एकेक पीस देतो. यापेक्षा आपण त्याची सर्व पिसे एकाच वेळी काढून घेतली तर आपण खूप श्रीमंत होऊ.

एके दिवशी हंस घरी आल्यावर तिने त्याला पकडले आणि जबरदस्तीने त्याची सर्व पिसे उपटून काढली. पण आश्चर्य म्हणजे, ती पिसे जमिनीवर पडताच साध्या पिसांमध्ये बदलली. हंसाला खूप वेदना झाल्या. काही दिवसांनी त्याला नवी साधी पिसे आली आणि तो कायमचा उडून गेला.

त्या स्त्रीला आपल्या लोभाचा खूप पश्चात्ताप झाला. तिने मिळणारे थोडेसे सुखही गमावले.

बोध : लोभामुळे माणूस स्वतःचे नुकसान करून घेतो.

## जीवन का अमृत (भाग १)



### ज्ञान की ग्रहणशीलता

अगर आध्यात्मिक उपलब्धियाँ इस प्रकार के दिखावे में बर्बाद की जाएँ तो बहुत संभावना है कि मुश्किल से प्राप्त की गई आध्यात्मिक योग्यता खत्म हो जाएगी। अनुशासित नामलेवाओं को बहुत ही विनम्र, धर्मनिष्ठ और ईश्वरीय दया के प्रति बहुत कृतज्ञ होना चाहिए। आपको पता होना चाहिए कि प्रभु इन चमड़े की आँखों से नहीं देखा जा सकता और जिनके सामने वह प्रकट होता है, उन्हें अवश्य ही चुपचाप रहकर ग्रहणशील बनना चाहिए तथा उसकी इच्छा और खुशी के प्रति समर्पित होना चाहिए । रूहानियत इंसानी जिंदगी का सबसे ऊँचा लक्ष्य है और यह सबसे मुश्किल भी है। केवल वे ही, जो वास्तव में सत्य की खोज में हैं, इस रास्ते पर चलने का साहस करें। आध्यात्मिक जिज्ञासु को, एक घुड़सवार की तरह, अपने दोनों पाँव रकाबों में रखने चाहिएँ, ताकि वह बहुमुखी सफलता पाए। ऐसी शांत और खुशहाल जिंदगी एक वरदान बन जाती है, जब आप रूहानी और सांसारिक, दोनों प्रकार की सफलताएँ पाते हैं। (क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### आपले अस्तित्व

आपल्याकडे आपण कसे असणार आहोत याचीसुद्धा एक यादी हवी - टु बी लिस्ट. आपण फक्त काम करणारी माणसं नसून आपण चैतन्यशक्ती आहोत.

सुरेश ओबेरॉय : आपण बाजारातून प्रेम घेऊ शकलो असतो तर चांगलं झालं असतं.. शिवानीदीदी हेच करण्याचा प्रयत्न आपण करतोय. आपण प्रेम विकत घेण्याचा, माणसांमध्ये आणि वस्तूंमध्ये प्रेम शोधायचा प्रयत्न करतोय. आजपर्यंत आपण गोष्टी उलट्या क्रमाने करत होतो. आपण असा विचार केला की एखादी विशिष्ट गोष्ट मी केली तर मला छान वाटेल. आपल्याला वाटलं, अनुभव घेऊ शकू. आपण एखादं काम केलं तर आपण आपल्या अस्तित्वाचा पण त्याऐवजी आपण काय केलं? आपल्याला आपल्या अस्तित्वावर लक्ष द्यावं लागेल ज्यामुळे आपण त्याला कृतीत (बीइंगला डूइंगमध्ये) उतरवू शकू. तेव्हाच आपल्याला प्रेम आणि शांती अनुभवता येईल. काय काय करायचं टुडू लिस्ट पूर्ण करूनही आपल्याला आतून पोकळ, निःसार वाटत असेल तर याचं कारण म्हणजे आपलं आपल्या अस्तित्वाकडे कधीच लक्ष नव्हतं. (क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

वडील : अभ्यास केला का? मुलगा: हो!
वडील : काय वाचलं? मुलगा: स्टेटस अपडेट
वडील : आणखी हवे असतील तर सांग

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

भारत सरकारच्या इक्विटीच्या स्वरुपात व्होडाफोन आयडीयाचा किती टक्के भाग आहे? - ३५.८ टक्के

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## साहित्य सहवास - 'ऊन - ए. सी.'

मित्रानं नवीन चारचाकी घेतली. आम्ही तिघे मित्र त्याच्या नवीन गाडीत निघालो. मे महिन्यातलं ऊन म्हणजे प्रचंड उन्हाचा चटका. नव्या गाडीत एसी चालु असल्यामुळे चटका जाणवत नव्हता. नवीन चारचाकी चालवतांना मित्र भलताच आनंदात. आमच्या कॉलनीत मंदिर बांधलं. तिथं विठ्ठलाची मुर्ती असावी असं सगळ्यांनी ठरवलं. म्हणून आम्ही चारचाकीतुन चाललो. डी. एस. पी. चौकात सिग्नलसमोर गाडी थांबली. बऱ्यापैकी वय असलेल्या तरुण मुलानं गाडीची पुढची काच, पाणी टाकुन, कापडाने पुसली. मित्राला पैसे मागितले. मित्राने रागानेच नकार दिला. तो बिचारा तरुण तेथुन काहीही प्रतिक्रिया न देता निघाला. बाजुला उभ्या असलेल्या चारचाकीच्या पुढच्या काचेवर पाणी टाकुन, कपड्याने काच स्वच्छ केली. त्या कारवाल्याने दहाची नोट दिली. हिरवा सिग्नल मिळाला. आम्ही निघालो. त्याचक्षणी मी, माझ्या मित्राचा, त्या कार पुसणाऱ्या तरुणाचा आणि त्या दुसऱ्या कारवाल्याचा विचार करत होतो.

मुर्ती कारखान्यात आलो. मुर्तीकार पत्र्याच्या एका खोलीत घामाने चिंब अवस्थेत मन लावुन मुर्ती तयार करतो आहे. त्या कारखान्यातील आणखीही काही मुर्त्या आम्ही पाहिल्या. मुर्तीकाराच्या कलेचं, मला मनापासून कौतुक वाटलं. अत्यंत सुंदर, सुबक मुर्त्या पाहुन आम्हाला प्रसंन्न वाटलं. सगळ्याच मुर्त्या मनापासुन आवडल्याचं, मी मुर्तीकाराला सांगितलं, त्याची गळाभेट घेतली. मुर्तीकाराचा हसरा चेहरा पाहुन मलाही छान वाटलं. मुर्तीकार म्हणाला माझ्या कलेचं कौतुक करणारे शेकडो व्यक्ती भेटल्या. पण गळाभेट घेणारे तुम्ही पहिलेच आहात. आज मला फक्त अत्यानंद झाला नाही तर समाधान मिळालं. मी त्याला म्हणालो कलाकाराचं कौतुक करायलाच हवं. तुमच्या हातात जादु आहे. आम्ही विठ्ठलाची एक मुर्ती निश्चित केली. काही रक्कम देऊन निघालो. पुन्हा डी. एस.पी. चौकात आलो. त्याच मुलानं पुन्हा पुढच्या काचेवर पाणी टाकुन, कपड्याने काच स्वच्छ केली. ह्यावेळीही मित्राची काहीच प्रतिक्रिया नाही. मी दहाची नोट त्या तरुणाला दिली.

मित्र माझ्याकडे पाहु लागला. हिरवा सिग्नल मिळाला. आम्ही निघालो, पुढे आलो. मी म्हणालो ऊसाचा रस पिऊ. तिघेही ऊसाच्या रसाच्या गाडीजवळ ऊभा राहिलो. आता मात्र उन्हानं स्वतःचं अस्तित्व दाखवायला सुरुवात केली. रस तयार होईपर्यंत मित्र घामाघुम झाला. रस पिलो. मी पैसेदिले. निघतांना मी म्हणालो. चपला हातात घेऊन अनवाणी चालत जाऊन गाडीत बसु. मी चपला हातात घेतल्या तो पर्यंत ते दोघं पळत (चपला हातात न घेता) जाऊन गाडीत बसले. मी अनवाणी चालत आलो गाडीत बसलो. मी म्हणालो ऊन आणि एसी दोघांचीही कदर करायला शिक. तो तरुण भर उन्हात साधा शर्ट, एक मळकट टोपी घालुन येणाऱ्या- जाणाऱ्या चारचाकीच्या पुढच्या काचांवर पाणी ओतुन, कापडाने काच पुसत होता. आपण एसीत बसलो होतो म्हणून आपल्याला चटका देणाऱ्या उन्हाची तीव्रता अजिबात जाणवली नाही. तुलातर नाहीच नाही. मित्रा, फक्त एकदाच त्याच्या भूमिकेत जाऊन फक्त विचार कर. त्याच्या परिस्थितीमुळं तो उन्हाची कदर करतोय. एसीची थंडगार हवा त्याला कधीच मिळणार नाही पण तो एसीत बसलेल्यांना, काचा पुसुनही पाच दहा रुपये सुध्दा दिले नाहीत म्हणून वाईट म्हणत नाही.

निर्विकार चेहऱ्याने तो दुसऱ्या गाडीची काच पुसतो. खऱ्या अर्थाने तो आपल्यापेक्षा मनाने मोठा आहे. एवढ्या कडक उन्हात ऊभा राहुनही तो एसीसारखा थंडगार असतो. ह्याचं मला कौतुक वाटलं. पण तू एसीत बसुन शरिराने थंड होतास पण मनाने ऊन्हासारखा कडक, गरम होतास. तो मुर्तीकार त्या पत्र्याच्या खोलीत घामाघूम झालेला होता. पण विठ्ठलाची मुर्ती तयार करण्यात एवढा मग्न होता की देहभान हरपुन ऊन्हाला वाईट न म्हणता एसीसारखा थंडगार होता. एका तरी रागीट व्यक्तीचं भलं झालंय हे मला दाखव. कडक, वेदनादायी उन्हात राहुनही एसीसारखं थंडगार राहायचं सोप्पं काम नाही.

एसीची थंडगार झुळुक मनाला प्रसंन्नता, आनंद देते पण शरिरावर विपरित परिणाम करते हे तु लक्षात ठेव. तुम्ही दोघेही चपला हातात न घेता पळत जाऊन गाडीमध्ये बसलात. पण मी चपला हातात घेऊन अनवानी चालत आलो. खरं तर तळपायाला प्रचंड वेदना झाल्या, चटके बसले पण मी त्या कडक उन्हाला काहीही म्हणालो नाही. ए. सी. चा अर्थ तुम्ही दोघं एअर कंडिशनर एवढाच घेता मी ए.सी चा अर्थ ॲक्सेप्ट कुलनेस, ॲक्सेप्ट कामनेस असा घेतो त्यामुळे मनाची तयारी होते ऊन स्वीकारायची. दोघांनीही मन एकाग्र करुन माझं ऐकलं. मित्र म्हणाला खुप चांगलं असं सांगितलंस आज जे आता मनात कोरलं गेलंय. ऊन आणि एसीचा अस संबंध मी कधीच लावला नसता पण आज तु माझ्या विचारांची दिशा बदललीस. आता दोघांनीही माझी गळाभेट घेतली. मी म्हणालो हे सगळं माझा विठ्ठल मला सुचवतो. तेच मी बोलतो. गाडी सुरु केली. विठु माऊली तू माऊली जगाची... गाणं ऐकत आम्ही घराकडे निघालो.

(लेख क्र.६०१)

**- सुनील राऊत**
माळीगल्ली, भिंगार, अहिल्यानगर
मो.९८२२७५८३८३

## आहारवेद - आरोग्य संवर्धन

१४) काकडीचा कीस चेहरा, मान यावर नियमावल्यास चेहयावरील सुरकुत्या दूर होऊन चेहरा कांतिमान होतो. तसेच हा रस केसांना लावल्यास त्यामध्ये असणाऱ्या सिलिकॉन व गंधकामुळे केस गळायचे थांबून वाढतात.

सावधानता : काकडी ही शीत गुणधर्माची असल्याने वर्षा आणि शरद ऋतूत जास्त प्रमाणात खाऊ नये. खायची असेल तर थोड्या प्रमाणात व तीही मध्ये न ठेवलेली सामान्य तापमानाची खावी.

-------------

### कारले

चवीने कडू असलेले कारले हे आरोग्यासाठी अत्यंत हितावह आहे. कारले भारतात सर्वत्र पिकते व अति प्राचीन काळापासून कारल्याचा उपयोग फळभाजीबरोबरच औषधातही केला जातो. संस्कृतमध्ये 'कंदूरा' (फरवाड़ी), हिंदीमध्ये 'करेला', इंग्रजीमध्ये 'कॅरीला फ्रुट' किंवा 'बिटर गोर्ड', तर शास्त्रीय भाषेमध्ये 'मोमोका चॅरानटीया' म्हणून ओळखले जाणारे कारले ही वनस्पती 'कुकरबिटेसी' या कुळातील आहे. कारले हिरवट, पांढरसर, काळसर हिरव्या रंगाची आणि पिकल्यानंतर आतून लाल, केशरी होतात. कारली मोठी आणि लहान अशा दोन प्रकारची असतात, तर रंगभेदामुळे कारल्याचे पांढरी, हिरवी असेही दोन प्रकार आढळतात.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००

# अभिनयातून माणसं वाचायला मिळाली : अभिनेते योगेश सोमण

## अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाच्या वसंत व्याख्यानमालेचे उद्घाटन

नगर – लेखन प्रशिक्षण दिग्दर्शन आणि अभिनय या सिने सृष्टीतील टप्प्यात माझ्या दृष्टीने अभिनय हा हा क्राफ्ट वर्क मध्ये शेवटच्या पायरीवर आहे. तरीही अभिनयाने मला चेहरा दिला हे सत्य असले तरी माझ्या दृष्टीने अभिनयातून मला माणसं वाचायला मिळाले. त्यातून जीवन समृद्ध होत गेले असे प्रतिपादन चित्रपट अभिनेते, नाट्य कलाकार व महाराष्ट्र साहित्य परिषद पुणेचे अध्यक्ष योगेश सोमण यांनी व्यक्त केले. अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाच्या वसंत व्याख्यानमालेच्या उद्घाटन सत्राचे पहिले पुष्प गुंफतानामाझ्या भूमिकेने मला काय दिले या विषयावर सोमन बोलत होते.



अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाच्या वसंत व्याख्यानमालेचे उद्घाटन करताना अभिनेते योगेश सोमण. (छाया – सुरेश मैड)

यावेळी वसंत व्याख्यानमालेचे उद्घाटक जिल्हा ग्रंथालयाचे निरीक्षक रामदास शिंदे, वाचनालयाचे कार्यवाह विक्रम राठोड, उपाध्यक्ष दिलीप पांढरे, मसाप चे जिल्हा अध्यक्ष जयंत येलुलकर, संचालिका प्राध्यापिका ज्योती कुलकर्णी, संयोजिका शिल्पा रसाळ, वैद्य राजा ठाकूर, किरण आगरवाल, राहुल तांबोळी, कवि चंद्रकांत पालवे, ग्रंथपाल अमोल इथापे, नितीन भारताल, पल्लवी कुक्कडवाल उपस्थित होते.

रसिक नगरकरांच्या गर्दीने गच्च भरलेल्या सभागृहात जीवन प्रवासातील अनेक भूमिका विषयी बोलताना सोमण यांनी मंत्रमुग्ध केले. लहानपणी प्रारंभी नाटकात राजा भरताची प्रॉम्प्टर म्हणून दुय्यम भूमिका मिळाली असताना स्टेजवर कब्जा मिळवण्याची झिंग या वाटेवर प्रेरक ठरली. नाटकामध्ये २५ वर्ष भूमिका करताना छत्रपती शिवाजी महाराज, लोकमान्य टिळक, चाणक्य यासारख्या महान व्यक्तींचा अभ्यास व अभिनयाच्या क्षमता यातून निर्माण होत गेल्या. नाट्यक्षेत्रातून सिनेक्षेत्रात पाऊल टाकताना मालिकांच्या माध्यमातून अल्पावधीत मला भूमिकांनी नवा चेहरा दिला. पुणे ते मुंबईचा हा प्रवास खडतर तसाच त्यात सामावल्यावर शिप मध्ये काम करणाऱ्या नोकरदारासारखा होता. डेली सोप मध्ये भूमिका सुरू झाल्यावर नांदा सौख्य भरे मधील सात्विक भूमिका ते क्राइम पेट्रोल मधील पोलिस अधिकाऱ्याची भूमिका यातून वेगवेगळ्या प्रेक्षक वर्गात मी त्यांच्या घरातील एक चेहरा झालो. त्यातून चैनल ची ताकद मला समजली. हिंदी चित्रपट सृष्टीत दृश्यम च्या माध्यमातून भूमिकांमध्ये प्रवेश करताना मराठी व हिंदी सिनेसृष्टीतील फरक, व्यावसायिक शिस्त, यातील फरक मला माझ्या समजला. माझ्या चेहऱ्यामुळे प्रथमच मला उरी चित्रपटातून संरक्षण मंत्री मनोहर पर्रीकर यांची भूमिका मिळाली. या डिफेन्स मिनिस्टरभूमिकेमुळे आयुष्यभरासाठी मला नवीन ओळख या अभिनयाने दिली. इतकेच नव्हे तर गोव्यात गेल्यावर जनसामान्यातील माणसाला ती किती जवळची वाटली याचा अनुभव अनेक वेळा आला.

पुढे बोलताना सोमण यांनी नाट्य सेनेसृष्टीच्या प्रवासात संतश्रेष्ठ तुकारामांच्या आनंद डोह या प्रयोगातून सद्गुरु, अध्यात्म व अदृश्यशक्ती तुन मी नव्हे तर परमात्म्यामुळे माझ्याकडून करून घेतलेले कामातून माझा अहंकार गळून पडला. आपण हाती घेतलेला कामाचा संकल्प सोडून लेखन, सादरीकरण, घंटानाद या साऱ्यांचा घडत गेलेला चमत्कार हा माझा नव्हे तर ब्रम्हांडातील अदृश्य शक्तीचा असल्याचे सांगून या सगळ्यातून माझ्यातील व्यक्तीमत्त्वाच्या स्निग्धतेत भर पडत गेली असल्याचे प्रांजळपणे व्यक्त केले.

यावेळी उद्घाटक रामदास शिंदे यांनी जिल्हा वाचनालयाची वसंत व्याख्यानमालेची परंपरा ही माणूस घडवण्याची अखंड यात्रा आहे. उत्तंग व्यक्तिमतची माणसे, त्यांचा प्रवास यावेळी ऐकणेही मोठी पर्वणी असून रसिक नगरकरांनी स्वतःला या अनुभवातून समृद्ध करून घ्यावे असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे औचित्य साधून सिनेकालाकार मोहनिराज गटणे व ज्येष्ठ रंगकर्मी पीडी कुलकर्णी, जयंत येलूलकर विभागीय कार्यवाहपदी निवड झाल्याबद्दल यांचा जिल्हा वाचनालयाचे वतीने सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास साहित्य, नाट्य, सामाजिक, राजकीय क्षेत्रातील रसिक उपस्थित होते. प्रास्ताविक आणि आभार प्रा.ज्योती कुलकर्णी तर परिचय शिल्पा रसाळ यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी कर्मचारी वर्गाचे सहकार्य लाभले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## मज देई सतसंग

"मुसाफिर" वाचनीय मननीय अक्षर धन

संकलन: दिशान फिचर्स




माणसाची पारख करता यावी. त्याची वृत्ती पाहून योग्यता ठरवावी. अयोग्य माणसाला जवळ केले, की आपले नुकसान होतेच. एवढेच नव्हे, दुसऱ्यांवरही नष्टचर्य ओढवते. माणूस कुशल असावा; वाईटातूनही चांगले शोधणारा असावा. त्याच्या हाती लोखंड लागले, तरी त्याचे सोने झाले असा प्रत्यय यावा.

अनुभवाने शिकावे. गाय खाते काय? गवत नुसते. पण गायीची थोरवी जाणवते जेव्हा ती त्या गवताचे गोड दूध करते. ते तुमच्या बाळाला पोसते; जगाचे जीवन ठरते. पण तेच दूध तो नाग क्षणात गट्ट करतो आणि त्याचे विष बनवितो. या नागासारखे दुर्जन असतात सभोवती. ते पारखता यावेत. सज्जनांना जवळ करावे; आपणही सज्जन व्हावे. एकमेका उद्धारावे. जगाचे नंदनवन करावे.

संतांच्या संगतीत भेटतो परमेश्वर मग कळते, की हा स्वार्थ, हा मोह, ही माया हे सगळे नश्वर. टिकाऊ आहे फक्त परोपकार. दूध पचवून त्याचे विष करणारे सापाच्या जातीचे दुर्जन दूरच ठेवावे.

स्वतः खोटे बोलतो. खऱ्याचेही खोटे करतो. त्यात भर सज्जनांच्या निंदेची घालतो. अशाचे तोंड काळे होवो. असा दुर्जन म्हणजे पापांचे पिंप. सदा दुष्ट विचारांचेच तिथे शिजणे. इतरांना दुःख देती अपार, घातपात करणे हा एकच आचार. असा दुष्ट नेहमी कष्टच भोगेल. किडे होऊन नरकात पडेल. एक होती नदी. तिच्या काठी किती तरी लहान लहान खेडी. काही उंच जागी, तर काही खाली. पूर आला की खोलात असलेल्या खेड्यात पाणी शिरायचे. झोपड्यातली भांडी, कपडे वाहून जायचे. एकदा खूपच मोठा पूर आला. खालचे एक खेडे वाहून जाऊ लागले.

उंचवट्याच्या गावातल्या काही लोकांनी त्या खेड्यातल्या लोकांना मदतीचा हात द्यायचे ठरविले. भांडीकुंडी, अन्न व कपडे घेऊन ते त्या खेड्याकडे निघाले. एक दुर्जन मात्र आपल्या मित्राला म्हणाला, अरे उत्तम संधी आहे. पुरात उडी टाकू. वाहत आलेली भांडी आणि कपडे काढून आणू. आयता माल मिळेल. त्या मित्राला आधी कसेसेच वाटले, पण दुर्जनाने त्याला पठविले. मग दोघे पुरात उड्या मारून भांडी व कपडे काढून आणू लागले. तेवढ्यात एक घोंगडे वाहत आले. दुर्जनाने मित्राला ते काढायला सांगितले. मित्राने पुरात उडी मारली. घोंगडे पकडले. पण बराच वेळ झाला, तरी मित्र घोंगडे घेऊन पुराबाहेर येईना. दुर्जन म्हणाला, अरे घोंगडे घेऊन ये ना! मित्र म्हणाला, घोंगड जड आहे. दुर्जन म्हणाला, मग सोडून दे.

मित्राने घोंगडे केव्हाच सोडले होते, पण ते त्याला सोडत नव्हते. ते घोंगडे नसून अस्वल होते. दुर्जनामुळे मित्र पुरात बुडाला; मृत्युमुखी पडला.ऽ ऽ ऽ

– किशोर गांधी

# अलहाज शेख अब्दुल अजीज उर्दू कॉलेजचा बारावीच्या बोर्ड परिक्षेचा निकाल ९० टक्के



खान सदफ | शेख तहरिन | शेख तहुरा

नगर – अलफलाह एज्युकेशन अॅण्ड वेलफेअर सोसायटी संचलित अलहाज शेख अब्दुल अजीज उर्दू ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्टस्, आलम गीर, नागरदेवळे, अहिल्यानगर या कॉलेजने यशाची परंपरा कायम ठेवत फेब्रुवारी–२०२६ मध्ये झालेल्या बारावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे.

ज्युनिअर कॉलेजचा बारावीचा निकाल ९१.२५ टक्के लागला आहे, या परीक्षेमध्ये ४१ विद्यार्थी सहभागी झाले होते. यापैकी खान सदफ चाँद हिने ८५.१७ टक्के गुण प्राप्त करून प्रथम क्रमांक मिळविला आहे. तर शेख तहेरीन मोसीन हिने ८३.६७ टक्के गुण प्राप्त करून द्वितीय क्रमांक प्राप्त केला असून, शेख तहुरा रियाज हिने ८२.३३ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला आहे.

यशस्वी विद्यार्थिनींना संस्थेचे प्रमुख कार्यवाह प्रा.डॉ.हाजी शेख अब्दुस सलाम अब्दुल अजीज, प्राचार्य शेख जमीर अहमद इस्माईल तसेच शिक्षिका शेख आफरीन शफीयुद्दीन, खान निशातअंजुम सोहिल, तांबोळी नसरीन मुबीन, शेख महेनाज अब्दुस सलाम यांचे मार्गदर्शन मिळाले.

# दुसरे बालपण स्पर्धा एकाच दिवशी १२ नाटिकांचा आनंद घेण्याची संधी

## मोफत प्रवेशिका उपलब्ध




नगर – येथील डॉ. कांकरिया यांच्या मानकन्हैय्या ट्रस्ट आयोजित दुसरे बालपण स्पर्धेची तयारी पूर्ण झाली असून २० मे रोजी माऊली सभागृहात होणाऱ्या या स्पर्धेत एकूण १२ संघ सहभागी झाले आहेत. त्यामुळे एकाच दिवशी १२ नाटके पाहण्याची रसिक प्रेक्षकांसाठी सुवर्णसंधी आहे. सदर नाटिका पाहण्यासाठी सन्मानिकांचे आयोजन करण्यात आले असून मोफत उपलब्ध असणाऱ्या या सन्मानिकांचा लाभ सर्वांनी घ्यावा अशी माहिती कार्याध्यक्ष डॉ. सुधा कांकरिया यांनी दिली आहे.

सदर सन्मानिका सावेडी येथील हेमंत लोहगावकर, माय टिफिन, अहमदनगर मर्चन्ट बँकेच्या जवळ, गुलमोहोर रोड., प्रशांत कटके आणि सदाशिव मोहिते पंचवटी कॉलनी, प्लॉट नंबर १३, पाच गोडाऊन जवळ, केडगाव, अहिल्यानगर., साई सुपर मार्केट, गवळीवाडा, भिंगार, के मार्ट, जलसा हॉटेल जवळ, आलमगीर रोड, भिंगार, तसेच माणिक चौक येथील साई सूर्य नेत्र सेवा येथे सकाळी १०.३० ते २.३० आणि सायं ६.३० ते ९.३० या वेळेत उपलब्ध आहेत. सन्मानिकेची संख्या मर्यादित असल्यामुळे रसिक प्रेक्षकांनी लवकर याचा लाभ घ्यावा असे आवाहन डॉ. प्रकाश कांकरिया यांनी केले आहे.

दुसरे बालपण या ज्येष्ठ नागरिकांनी सादर केलेल्या कला आनंद महोत्सवाचे हे तिसरे वर्ष असून यंदाच्या वर्षी ओंकार संगीत निकेतन भिंगार, आमचे आम्ही अहिल्यानगर, रोटरी क्लब ऑफ अहमदनगर, मधुबन संघ अहिल्यानगर, स्वरधारा ग्रुप आधार आपुलकीचा फाउंडेशन अहिल्यानगर, इंटरनॅशनल बेंचमारलिंग अहिल्यानगर, रखुमाई भजन ग्रुप भिंगार, सप्तरंग थिएटर्स अहिल्यानगर, स्वयंसिद्ध ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संघ छत्रपती संभाजीनगर, येवला ज्येष्ठ नागरिक संघ, प्रभू मिलन ज्येष्ठ नागरिक संघ येवला, ओम नाट्य संस्कार यांचा सहभाग आहे. शुभमंगल नृत्य नाटिका, आम्ही लग्नाळू संगीत नाटिका, सहावीस लग्नाची गोष्ट, सात फेरे संसाराचे आठवा फेरा संस्काराचा, लग्न सोहळा... की गरज?, जागतिक लग्न उत्सव, विवाह सोहळा एक उत्सव... की इव्हेंट मॅनेजमेंट?, विवाह समारंभातील गमती जमती, मंगलाष्टक डॉट कॉम, एक आगळा सोहळा या नाटकांचे सादरीकरण होणार आहे.

जगात पहिल्या व एकमेव असणाऱ्या या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी संयोजन समिती मधील पी डी कुलकर्णी, चंद्रकांत पालवे, सदाशिव मोहिते, नंदकुमार देशपांडे, प्रशांत कटके, जयंत येलुलकर, प्रसाद बेडेकर, चंद्रकांत पंडित, हेमंत लोहगावकर, प्रिया सोनटक्के, रामदास केदार, दीपक शिरसुल हे परिश्रम घेत आहेत. या स्पर्धेमध्ये सांघिक प्रथम रुपये ५००० करंडक व मानपत्र, सांघिक द्वितीय रुपये ३००० स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र, सांघिक तृतीय रुपये २००० स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र, उत्तेजनार्थ रुपये १००० स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र आणि खास दुसरे बालपणासाठी केलेल्या लेखनासाठी रुपये १००० स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र अशा पारितोषिकांचे नियोजन केले असून प्रेक्षकांसाठी ही काही पारितोषिके जाहीर करण्यात येत आहेत. त्यात सर्व नाटके पाहणाऱ्या प्रेक्षकास तसेच नाटकेचे योग्य मूल्यांकन करणाऱ्या प्रेक्षकांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात येणार आहे.

# शिक्षण विभागाच्या बैठकीत संघटनांचा संताप; अडवणूक आणि आर्थिक त्रासाच्या तक्रारींचा पाढा; कार्यालयीन अधीक्षकांच्या बदली अथवा निलंबनाची मागणी; आ. किशोर दराडेंनी घेतले फैलावर

## शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांवर शिक्षक आमदार किशोर दराडे यांची अधिकाऱ्यांना सूचना

नगर – अहिल्यानगर जिल्ह्यातील मुख्याध्यापक, शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत १५ मे रोजी नाशिक विभागाचे शिक्षक आमदार किशोर दराडे यांच्या उपस्थितीत विशेष बैठक पार पडली. शहरातील शासकीय विश्रामगृह येथे झालेल्या या बैठकीत शिक्षक, मुख्याध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांसमोर आपल्या अडचणींचा पाढा वाचत प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली.




अहिल्यानगर जिल्ह्यातील मुख्याध्यापक, शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत १५ मे रोजी नाशिक विभागाचे शिक्षक आमदार किशोर दराडे यांच्या उपस्थितीत विशेष बैठक पार पडली.

बैठकीस जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभागाच्या शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड, वेतन पथक अधीक्षक रामदास म्हस्के, उपशिक्षणाधिकारी आकाश दरेकर, संध्या भोर यांच्यासह माध्यमिक शिक्षक सोसायटीचे चेअरमन आप्पासाहेब शिंदे, मुख्याध्यापक संघाचे सचिव संभाजी पवार, जुनी पेन्शन कोअर कमिटीचे राज्य सचिव महेंद्र हिंगे, प्रा. सुनील पंडित, अमोल ठाणगे, रवी गावडे, अशोक आव्हाड, तौसिफ शेख, उमेश शिंदे, प्रसाद सामलेटी, संजय थोरात, रवींद्र डमाळे, देवढे सर, दिलीप काटे आदींसह विविध शिक्षक संघटनांचे पदाधिकारी आणि शिक्षक उपस्थित होते.

आमदार दराडे यांचे स्वीय सहाय्यक हरीश मुंडे व वैभव सांगळे यांच्या पुढाकारातून या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीदरम्यान शिक्षकांनी त्यांच्या दैनंदिन कामकाजातील अडचणी, प्रशासकीय विलंब, आर्थिक अडचणी तसेच विभागीय स्तरावरील त्रुटींबाबत सविस्तर मांडणी केली. अनेक प्रश्न दीर्घकाळ प्रलंबित राहिल्याने शिक्षक व कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी व्यक्त केली.

प्रलंबित मुख्याध्यापक मान्यता, निवडश्रेणी मान्यता, अतिरिक्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे समायोजन या प्रश्नांवर चर्चा करत आमदार दराडे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाही करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या. तसेच रोस्टर तपासणीतील विलंब, संचमान्यतेतील त्रुटी दुरुस्तीचे रखडलेले प्रस्ताव, अनुकंपा नियुक्ती मान्यता, रजा कालावधीत नियुक्त शिक्षकांच्या मान्यतेसंदर्भातील अडचणी यावरही अधिकाऱ्यांशी चर्चा केली.

शालार्थ प्रणालीमध्ये पोस्ट क्रिएशन, जन्मतारीख व नियुक्ती दिनांक दुरुस्तीसाठी शिफारशी उशिरा मिळणे, प्रस्ताव अडवून ठेवणे, पीएफ पावत्या, न परतावा व अंतरीम प्रलंबित पावत्या, प्रलंबित वैद्यकीय बिले तसेच एनपीएसमधील रक्कम कर्मचाऱ्यांच्या खात्यात वर्ग करताना होणारा विलंब या विषयांवर शिक्षक व कर्मचाऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. यावेळी आमदार दराडे यांनी सर्व प्रश्नांवर सकारात्मक चर्चा करत ते निकाली काढण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.

बैठकीत उपस्थित शिक्षक व कर्मचाऱ्यांनी प्रशासनाने तातडीने निर्णय घेऊन प्रलंबित प्रश्न सोडवावेत, अशी मागणी केली. तर आमदार दराडे यांनी शिक्षक, मुख्याध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांबाबत प्रशासनाने संवेदनशीलतेने काम करावे, अन्यथा पुढील काळात अधिक कठोर भूमिका घेतली जाईल, असा इशाराही दिला.

### कार्यालयीन अधीक्षकांविरोधात शिक्षक संघटनांचा संताप

बैठकीत माध्यमिक शिक्षण विभागातील कार्यालयीन अधीक्षकांविरोधात शिक्षक संघटनांनी गंभीर आरोप केले. फायली मंजूर करण्यासाठी अडवणूक केली जाते, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आर्थिक व्यवहारासाठी त्रास दिला जातो, अशा तक्रारी संघटनांच्या प्रतिनिधींनी मांडल्या. काही महिला कर्मचाऱ्यांनीही अडवणूक होत असल्याचे बैठकीत स्पष्टपणे सांगितले. यामुळे संबंधित कार्यालयीन अधीक्षकांचे निलंबन अथवा बदली करण्याची मागणी शिक्षक संघटनांच्या वतीने करण्यात आली. बैठकीस अनुपस्थित असलेल्या कार्यालयीन अधीक्षकांना तात्काळ संपर्क साधून बैठकीत बोलावून घेण्यात आले. त्यानंतर शिक्षक आमदार किशोर दराडे यांनी संबंधित अधिकाऱ्याला चांगलेच फैलावर घेत, यापुढे अशा प्रकारच्या तक्रारी येऊ नयेत, अशी कठोर समज दिली.

# ना. रामदास आठवले यांना पॉलिटिकल एक्सिलेन्स अॅवॉर्ड




नगर – विनर्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड चा पॉलिटिकल एक्सिलेन्स अवॉर्ड पुरस्कार रिपाईचे अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांना राहुरी तालुक्यातील कणगर येथे प्रदान करण्यात आला आहे. सलग तिसऱ्यांदा राज्यसभेवर निवड झाल्या निमित्त रिपाई जिल्हा शाखेच्या वतीने राहुरी तालुक्यातील कणगर येथे रिपाई जेष्ठ नेते गोविंदराव दिवे यांच्या अध्यक्षतेखाली ना. आठवले यांचा सत्कार आयोजित करण्यात आला होता. यावेळी व्यासपीठावर रिपाई राज्य सचिव विजयराव वाकचौरे, जिल्हा संपर्कप्रमुख श्रीकांत भालेराव, प्रसिद्धी प्रमुख दीपक मेढे, जिल्हा अध्यक्ष सुरेंद्र थोरात, सुनील साळवे, युवा जिल्हा अध्यक्ष अमित काळे आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमात विनर्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डचा पॉलिटिकल एक्सिलेन्स अवॉर्ड केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांना १८४ वर्ल्ड रेकॉर्ड करण्यात पहिले भारतीय विनर्स बुक ऑफ रेकॉर्डचे अध्यक्ष डॉ. दीपक हरके यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी रिपाई महिला आघाडीच्या राष्ट्रीय अध्यक्ष सौ. सीमाताई आठवले, दीपक मेढे आदी उपस्थित होते.

# शिक्षक व कर्मचाऱ्यांना त्यांच्या कायदेशीर वेतनापासून वंचित ठेवणे अन्यायकारक

## बाबासाहेब बोडखे यांची माहिती, उन्हाळी सुट्टीतील मे-जून वेतन वेळेवर द्या; 'नियम १३'नुसार वेतन अदा करण्याची शिक्षक संघटनेची मागणी



नगर – राज्यातील खाजगी अनुदानित व अंशतः अनुदानित शाळांमधील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे उन्हाळी सुट्टी कालावधीतील मे व जून २०२६ चे नियमित वेतन वेळेवर अदा करण्यात यावे, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीचे निवेदन शिक्षक परिषद राज्य कार्याध्यक्ष नागो गाणार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शिक्षणमंत्री दादाजी भुसे, शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर, शिक्षण सचिव रणजित देओल यांच्यासह शिक्षण आयुक्त व शिक्षण संचालकांना दिल्याची माहिती शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे यांनी दिली.

निवेदनात म्हटले आहे की, राज्यातील खाजगी अनुदानित व अंशतः अनुदानित शाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या सेवा महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ अंतर्गत येतात. या नियमावलीतील नियम क्रमांक १३ नुसार उन्हाळी सुट्टी कालावधीतील मे व जून महिन्यांचे नियमित वेतन संबंधित कर्मचाऱ्यांना कायदेशीररित्या देय ठरते.

मात्र, अतिरिक्त शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या समायोजनाच्या कारणावरून अनेक शाळांची मे २०२६ ची वेतन देयके नाकारली जात असल्याचा आरोप शिक्षक परिषदेकडून करण्यात आला आहे. त्यामुळे राज्यातील अनेक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा प्रश्न निर्माण झाला असून, शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात असंतोषाचे वातावरण पसरले आहे.

शिक्षक परिषदच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे की, शिक्षण विभागातील काही अधिकाऱ्यांच्या नियमबाह्य व बेकायदेशीर निर्णयांमुळे ही गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील नियम क्रमांक १३ चा विसर शिक्षण विभागाला पडल्याचे दिसून येत असून, ही अत्यंत गंभीर बाब असल्याची भावना शिक्षक संघटनांकडून व्यक्त करण्यात आली. उन्हाळी सुट्टीच्या काळातही शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांवर आर्थिक जबाबदाऱ्या कायम असतात. अशा परिस्थितीत वेतन रखडल्यामुळे अनेक कुटुंबांवर आर्थिक संकट ओढवू शकते. त्यामुळे शासनाने तातडीने हस्तक्षेप करून संबंधित अधिकाऱ्यांना नियमांनुसार मे व जून २०२६ चे नियमित वेतन वेळेवर अदा करण्याचे स्पष्ट आदेश द्यावेत, अशी मागणी शिक्षक परिषदेकडून करण्यात आली आहे.

अतिरिक्त शिक्षक किंवा कर्मचाऱ्यांचे समायोजन ही स्वतंत्र प्रशासकीय प्रक्रिया असून त्याचा परिणाम उन्हाळी सुट्टीतील नियमित वेतनावर होऊ शकत नाही. कोणत्याही कारणास्तव शिक्षक व कर्मचाऱ्यांना त्यांच्या कायदेशीर वेतनापासून वंचित ठेवणे अन्यायकारक व नियमबाह्य आहे, असे बाबासाहेब बोडखे म्हणाले.


# घर बांधण्यापूर्वी...

**घर बांधण्यापूर्वी जाणून घ्याव्यात अशा १० महत्त्वाच्या गोष्टी**

घर बांधताना फक्त विटा आणि सिमेंट वापरले जात नाही, तर त्यात आयुष्यभराची बचत, स्वप्ने आणि अपेक्षा गुंतलेल्या असतात.

म्हणूनच घर बांधणे हा केवळ बांधकामाचा विषय नसून एक अत्यंत महत्त्वाचा जीवननिर्णय आहे. अनेक वेळा आपण घर सुंदर दिसावे यावर जास्त भर देतो, पण प्रत्यक्षात राहायला सोयीचे, हवेशीर आणि टिकाऊ घर असणे तितकेच गरजेचे असते. योग्य माहिती, नियोजन आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन असेल तर घर बांधताना होणाऱ्या अनेक चुका सहज टाळता येतात आणि भविष्यातील अडचणीही कमी होतात. याशिवाय, चांगल्या नियोजनामुळे वेळ, पैसा आणि श्रम यांचीही मोठी बचत होते.






**१. घराचे नियोजन सर्वात महत्त्वाचे**

घराचे प्लॅनिंग करताना कुटुंबातील सदस्यांची संख्या, त्यांचे दैनंदिन जीवन, सवयी आणि गरजा यांचा सखोल विचार करणे आवश्यक आहे. प्रत्येक जागा उपयोगी आणि सोयीस्कर असावी, तसेच घरातील हालचाल सुलभ राहील याचीही काळजी घ्यावी.

**२. तज्ज्ञांची मदत घ्या**

आर्किटेक्ट किंवा डिझायनर हा फक्त नकाशा काढणारा नसतो. तो जागेचा योग्य वापर करून घर अधिक आरामदायी, कार्यक्षम आणि सौंदर्यपूर्ण बनवतो. त्यांच्या अनुभवामुळे अनेक व्यावहारिक अडचणी आधीच ओळखून त्यावर उपाय करता येतात, ज्यामुळे अनावश्यक बदल टाळले जातात.

**३. बजेट स्पष्ट ठेवा**

घर बांधताना खर्च अनेकदा अपेक्षेपेक्षा वाढतो. त्यामुळे सुरुवातीलाच एक स्पष्ट आणि वास्तववादी बजेट ठरवणे गरजेचे आहे. तसेच काही अनपेक्षित खर्चासाठी थोडी अतिरिक्त तरतूद ठेवणेही शहाणपणाचे ठरते.

**४. नैसर्गिक प्रकाशाला महत्त्व द्या**

घरात पुरेसा सूर्यप्रकाश येणे हे केवळ सौंदर्यासाठी नाही, तर आरोग्यासाठीही महत्त्वाचे आहे. यामुळे घर अधिक उजळ आणि सकारात्मक वाटते, तसेच विजेचा वापरही कमी होतो आणि घर ऊर्जा–कार्यक्षम बनते.

**५. वायु नियोजन योग्य ठेवा**

चांगले वायु नियोजन घरात ताजेपणा टिकवून ठेवते. हवा खेळती राहिल्यास घरात ओलसरपणा कमी होतो, दुर्गंधी राहत नाही आणि एकंदरीत आरोग्यदायी वातावरण निर्माण होते.

**६. भविष्यातील गरजांचा विचार करा**

आजच्या गरजा वेगळ्या असू शकतात, पण पुढील काही वर्षांत कुटुंब वाढू शकते किंवा जीवनशैली बदलू शकते. त्यामुळे घर बांधताना भविष्यातील बदल लक्षात घेऊन लवचिकता ठेवणे फायदेशीर ठरते.

**७. स्टोरेजची योग्य योजना करा**

योग्य साठवणुकीचा अभाव असेल तर घर पटकन अस्ताव्यस्त दिसते. त्यामुळे कपाटे, स्टोअर स्पेस, किचन स्टोरेज यांचे नियोजन आधीच केल्यास घर अधिक नीटनेटके आणि कार्यक्षम राहते.

**८. दर्जेदार साहित्य वापरा**

घर हे दीर्घकाळासाठी असते. त्यामुळे सुरुवातीला थोडा अधिक खर्च झाला तरी चांगल्या दर्जाचे साहित्य वापरणे भविष्यातील दुरुस्तीचा खर्च कमी करते आणि घराची टिकाऊपणा वाढवते.

**९. सौंदर्य आणि उपयोगिता यांचा समतोल ठेवा**

फक्त आकर्षक दिसणारे घर पुरेसे नसते; ते रोजच्या वापरासाठी सोयीचे असणे अधिक महत्त्वाचे आहे. डिझाइन करताना सौंदर्य आणि कार्यक्षमता यांचा समतोल राखणे आवश्यक आहे.

**१०. घाई न करता निर्णय घ्या**

घर बांधणे ही आयुष्यातील मोठी गुंतवणूक आहे. त्यामुळे प्रत्येक टप्प्यावर शांतपणे, विचारपूर्वक आणि योग्य सल्ल्याने निर्णय घेणे आवश्यक आहे. घाईत घेतलेले निर्णय पुढे त्रासदायक ठरू शकतात.

शेवटी एक गोष्ट लक्षात ठेवावी–घर म्हणजे फक्त भिंती आणि छप्पर नाही; ते आपल्या कुटुंबाच्या आयुष्याशी जोडलेले असते. योग्य नियोजन, योग्य मार्गदर्शन आणि दूरदृष्टी यांच्या साहाय्यानेच आपले स्वप्नातील घर खऱ्या अर्थाने सुखद, सुरक्षित आणि आनंददायी बनते. अशा विचारपूर्वक उभारलेल्या घरातच खऱ्या अर्थाने समाधान, स्थैर्य आणि आनंदाचा अनुभव मिळतो.

आर्किटेक्चर म्हणजे फक्त इमारती नव्हे; ते माणसांच्या जगण्याला दिशा देणारी कला आहे.

सुंदर घर बांधणे सोपे असते, पण राहायला चांगले घर घडवण्यासाठी विचार, नियोजन आणि संवेदनशील दृष्टी आवश्यक असते.



**– आर्किटेक्ट स्वरूपा कुलकर्णी**
**B Arch**
**Ingenious Design Studio**
**संपर्क: ९१६८२२२६२२, ७७४३९०९९०९**
**इ– मेल: ingeniousdstudio@gmail.com**
**Web-site: www.ingeniousdesigns.in**

AESA
Architects, Engineers & Surveyors Association Ahilyanagar

## जैन ओसवाल धर्मशाळेच्या विश्वस्तपदी धनराज गांधी



नगर – येथील ज्येष्ठ पत्रकार व गृहरक्षक दलाचे माजी समादेशक धनराज माणकचंद गांधी यांची अहिल्यानगर येथील श्री जैन ओसवाल धर्मशाळा, नवीपेठ या संस्थेच्या विश्वस्तपदी आगामी तीन वर्षाकरीता सहआयुक्त धर्मादाय आयुक्त, अहिल्यानगर यांनी निवड केली आहे.

## ‘पितळे डायग्नोस्टिक्स’च्या माध्यमातून नगरकरांना अत्याधुनिक आरोग्यसेवेचा लाभ

### रक्त तपासणी व विविध वैद्यकीय अहवाल कमी वेळेत आणि अचूक मिळणार : ना. राधाकृष्ण विखे पाटील

नगर – पितळे डायग्नोस्टिक सेंटरच्या प्रगत व उच्च तंत्रज्ञान युक्त तपासणी तंत्रज्ञानामुळे नगर शहरातील रुग्णांना कमी कालावधीत व अचूक रक्त तपासणी आणि इतर वैद्यकीय तपासण्यांचे अहवाल मिळणार असल्यामुळे शहरासह संपूर्ण जिल्ह्याला याचा मोठा फायदा होईल. विखे पाटील फाउंडेशनच्या वैद्यकीय महाविद्यालयातून शिक्षण पूर्ण करून वैद्यकीय सेवेच्या माध्यमातून देशसेवेत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या डॉ. सुजाता जाधव–पितळे यांच्या कार्याचा आम्हाला अभिमान असल्याचे प्रतिपादन राज्याचे जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.




टीव्ही सेंटरजवळील पितळे डायग्नोस्टिक्स या अत्याधुनिक व सुसज्ज वैद्यकीय निदान केंद्राचे उद्घाटन करताना पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील. यावेळी जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, सर्जन कमांडर डॉ. देवदत्त पितळे, सुचिता लक्ष्मण पितळे, सोबत व्यासपीठावर बोलताना पालकमंत्री विखे पाटील, भाजपचे जिल्हा समन्वयक विनायकराव देशमुख, भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते आदी.

टीव्ही सेंटरजवळील मकासरे हेल्थकेअर शेजारी असलेल्या यशोदीप बिल्डिंग येथे पितळे डायग्नोस्टिक्स या अत्याधुनिक व सुसज्ज वैद्यकीय निदान केंद्राचे उद्घाटन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील व सुचिता लक्ष्मण पितळे यांच्या हस्ते झाले त्यावेळी ते बोलत होते. प्रारंभी सकाळी आमदार संग्राम जगताप यांनी पितळे डायग्नोस्टिक सेंटरला भेट देऊन शुभेच्छा दिल्या होत्या. कार्यक्रमासाठी महापौर ज्योती गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, भाजप शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, दक्षिण जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, भाजपचे जिल्हा समन्वयक विनायक देशमुख, अंबिका महिला बँकेच्या अध्यक्षा भारती आठरे, नगरसेवक अविनाश घुले, निखिल वारे, बाबासाहेब वाकळे, अनिल बोरुडे, डॉ. अनिल आठरे, डॉ. सतीश सोनवणे, डॉ. संदीप गाडे, उद्योजक नरेंद्र जाधव, शशिकांत आठरे पाटील, विलास तनपुरे आदी उपस्थित होते.

या केंद्रामध्ये अत्याधुनिक ‘सिक्स पार्ट सीबीसी ॲनालायझर’सह विविध आधुनिक उपकरणे उपलब्ध करण्यात आली आहेत. त्यामुळे रक्त, लघवी व इतर तपासण्यांचे अचूक आणि जलद अहवाल मिळणार आहेत. सर्व तपासण्या स्वतः डॉ. सुजाता जाधव–पितळे यांच्या देखरेखीखाली होणार असल्याने नगरकरांना विश्वासार्ह आणि दर्जेदार आरोग्यसेवा स्थानिक पातळीवर उपलब्ध होणार आहे. सर्जन कमांडर डॉ. देवदत्त पितळे यांनी आभार मानले.

### महिलांच्या आरोग्यासाठी अत्याधुनिक तपासणीची सुविधा

पितळे डायग्नोस्टिक्सच्या माध्यमातून अहिल्यानगरमध्ये प्रथमच लिक्विड बेस्ड सायटोलॉजी ही आधुनिक तपासणी सेवा सुरू करण्यात आली आहे. महिलांमध्ये आढळणाऱ्या गर्भाशय मुखाच्या कर्करोगाचे सुरुवातीच्या अवस्थेत अचूक निदान करण्यासाठी ही पद्धत अत्यंत उपयुक्त मानली जाते. तसेच मासिक पाळीतील अनियमितता, विविध स्त्रीरोग आणि इतर गंभीर आजारांचे निदान अधिक प्रभावीपणे करता येणार आहे.

या अत्याधुनिक सुविधेमुळे महिलांना तपासण्यांसाठी पुणे किंवा मुंबईसारख्या शहरांमध्ये जाण्याची गरज उरणार नसून दर्जेदार आरोग्यसेवा आता अहिल्यानगरमध्येच उपलब्ध होणार आहे.




अधिक मासानिमित्त महिला व उद्योजकता सक्षमीकरणासाठी शमी गणपती कार्यालय, दिल्लीगेट येथे आयोजित प्रदर्शनाचे उद्घाटन नगरसेविका दिपाली बारस्कर यांच्या हस्ते करण्यात आले.

## उद्योजकता प्रदर्शनातून ग्राहकांचा थेट संपर्क व जोडणी

### दिपाली बारस्कर यांचे प्रतिपादन, अधिक मासानिमित्त आयोजित महिला व उद्योजकांचे प्रदर्शनाचे उद्‌घाटन


नगर – अधिक मासानिमित्त प्रतिबिंब संस्थेच्या पुढाकारातून महिला व उद्योजकांसाठी चांगल्या प्रकारे प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनातून महिला उद्योजकांना प्रोत्साहन मिळते. व नवीन व्यवसाय करण्यासाठी व्यासपीठ खुले झाले आहे. शहराच्या मध्यवर्ती भागात हे प्रदर्शन असल्याने ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळणार आहे. तसेच प्रत्येकाला आपल्या व्यवसायाची ब्रॅण्डिंग करण्यासाठी व मार्केटिंग व प्रचार करण्यासाठी हे प्रदर्शन महत्त्वाचे ठरणार आहे. या उद्योजकता प्रदर्शनातून ग्राहकांचा थेट संपर्क व जोडणी होऊन वर्षभर ग्राहक जोडले जाणार असल्याचे प्रतिपादन महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीच्या सभापती दिपाली बारस्कर यांनी केले आहे.

अधिकमासा निमित्त १६ व १७ मे रोजी प्रतिबिंब संस्थेच्या वतीने अधिक मासा निम्मित महिला व उद्योजकता सक्षमीकरणासाठी शमी गणपती कार्यालय, दिल्लीगेट येथे सकाळी १० ते रात्री १० यावेळेत प्रदर्शन आयोजित केले असून त्यात शहरासह जिल्ह्यातील २५ महिलांचे स्टोल आहेत.

प्रदर्शनाचे उदघाटन महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीच्या सभापती दिपाली बारस्कर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी उपसभापती वर्षा सानप, रेणुका महिला मंडळाच्या अध्यक्षा गायत्री कुलकर्णी, संयोजिका अनुजा कांबळे, वनिता मानकर, जयश्री सूळ, ऋतुजा धोत्रे, प्रिया भागवत आदी उपस्थित होते.

या प्रदर्शनीत खरेदीसाठी कपडे, ज्वेलरी, लोणचे, पापड, मसाले, कडधान्य, कॉस्मेटिक, किड्स वेअर, फुड स्टॉल, नॅचरोपॅथी, आयुर्वेद, उन्हाळी वाळवण, गृहपयोगी वस्तू आदी बरेच काही स्टोल असणार आहेत. प्रदर्शनाला भेट देऊन व्यवसायिकांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## सनातन धर्मसभेच्यावतीने १७ मेपासून ‘अधिक मास विविध धार्मिक कार्यक्रम’




नगर – सनातन धर्मसभेच्या वतीने अधिकमासानिमित्त १७ मे ते १५ जून रोजी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

१७ मे ते १५ जून रोजी सकाळी ७.३० ते १२ श्री विष्णुसहस्त्रनाम पठण, श्री विष्णू पुजा व याग.

१७ ते २३ मे रोजी सायंकाळी ६ ते ८ ह.भ. प. सतिष कुलकर्णी व सहकारी यांचे संगीत गुरु चरित्र पारायण., २४ मे सायंकाळी ६ ते ८ वाजता ह.भ.प. निळकंठ देशमुख यांचे माऊली संजीवन समाधी सोहळा या विषयावर प्रवचन., २५ मे रोजी सायंकाळी ५ ते ८ कपील शास्त्री कवीश्वर यांचे प्रवचन., २६ ते ३१ मे दररोज दुपारी २ ते ६ वाजता गीता महिला मंडळाच्या वतीने ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी पारायण., २६ ते २७ मे ह.भ.प.कु. रेणुका निसळ यांचे नारदीय किर्तन., २८ ते २९ मे सायंकाळी ६ ते ८ वाजता ह.भ.प.योगेश कुलकर्णी यांचे नारदीय किर्तन

३० ते ३१ मे सायंकाळी ६ ते ८., ह.भ.प. डॉ.नेहा धर्माधिकारी (वाळुंजकर) यांचे नारदीय किर्तन., १ जून सायंकाळी ६ ते ८ ह.भ.प. निळकंठ देशमुख यांचे प्रवचन., २ ते ४ जून सायंकाळी ६ ते ८ आळंदीचे ह.भ.प. नरहरी महाराज सांगळे यांचे ज्ञानेश्वरीवरती प्रवचन., ५ ते ७ जून सायंकाळी ६ ते ८ आळंदी चे ह.भ.प. कैलास महाराज येवले यांचे ज्ञानेश्वरीवरती प्रवचन., ८ ते १४ जून सायंकाळी ५ ते ८ छत्रपती संभाजीनगर चे भागवताचार्य भगवान मुरलीधर डोशी यांचे भागवत कथासार निरूपण., १५ जून दुपारी १२ ते २ पूर्णाहुती व महाप्रसादाने या कार्यक्रमाची सांगता होणार आहे.

अधिक मासानिमित्त होणाऱ्या कार्यक्रमात श्री विष्णूपूजन व श्री विष्णू याग यामध्ये सहभागी होणारे यजमान यांनी वे. शा. सं निलेश धर्माधिकारी व वे. शा. सं बंडोपंत धर्माधिकारी, वे.शा.सं. सोमनाथ मुळे, वे.शा.सं.उमेश वाळुंजकर यांच्याशी संपर्क साधावा. या कार्यक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन सनातन धर्मसभेचे अध्यक्ष वेदमूर्ती महेश रेखे, निळकंठ देशमुख, उमेश नगरकर व विश्वस्तांनी केले.




शनि जयंती, अमावस्या आणि शनिवार अत्यंत पवित्र योग यंदा एकाच दिवशी आल्याने शहरातील माळीवाडा येथील शनि मारुती मंदिर परिसरात विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले होते. माळीवाडा पंच मंडळ देवस्थान ट्रस्टच्या वतीने भाविकांसाठी विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. तसेच यावेळी भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.

## दौंड–मनमाड मार्गावर १८ मे रोजी हायस्पीड रेल्वे वेगाची चाचणी



नगर – दौंड–मनमाड रेल्वेमार्गाच्या दुहेरीकरणाचे काम सध्या वेगाने सुरू असून, या प्रकल्पाच्या महत्त्वपूर्ण टप्प्यात १८ मे रोजी हायस्पीड रेल्वे इंजिन ट्रायल घेण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर रेल्वे प्रशासनाने नागरिकांना रेल्वे रुळांपासून दूर राहण्याचे आवाहन केले आहे.

रेल्वे प्रशासनाने प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनानुसार, अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोळनेर ते निंबळक या सेक्शनमध्ये सुमारे १८.२१ किलोमीटर अंतरावर ही हायस्पीड चाचणी पार पडणार असून, या वेळी इंजिनाचा वेग ताशी १३० किलोमीटर इतका असणार आहे. त्यामुळे हायस्पीड रेल्वे चाचणी दरम्यान रेल्वे मार्गावरील तसेच लगतच्या गावांतील नागरिकांनी विशेष खबरदारी घ्यावी. लहान मुले, जनावरे तसेच अन्य व्यक्ती रेल्वे रुळांजवळ जाणार नाहीत, याची दक्षता घ्यावी, असे आवाहन रेल्वे प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## आनंदऋषीजी नेत्रालयाचे दृष्टी देण्याचे कार्य नेत्रदीपक

### सीए प्रणेश शेटीया यांचे प्रतिपादन



आनंदऋषीजी नेत्रालयास शेटीया परीवाराच्यावतीने मोबाईल ॲम्बुलन्स व्हॅन चा लोकार्पण सोहळा पार पडला.

नगर – धावपळीच्या युगात महागडे औषध व तपासणीचा खर्च परवडत नसल्यामुळे अनेक वृद्ध व्यक्ती उपचारापासून वंचित राहतात. रुग्णा सेवा ही समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचावी. तसेच पैशाअभावी कोणत्याही व्यक्तीला अंधत्व येऊ नये. म्हणून आनंदऋषीजी नेत्रालय बीड, छत्रपती संभाजीनगर, मराठवाडा या भागात तसेच ग्रामीण भागात खेडोपाड्यात जाऊन तेथील रुग्णांचे मोतीबिंदू शस्त्रक्रिया मोफत करीत आहेत. आनंदऋषीजी नेत्रालयाचे कार्य सर्व दूर पसरले आहे. अंधाचे जीवन प्रकाशमान करून त्यांना नवी दृष्टी देण्याचे कार्य नेत्रालय मार्फत होत आहे. आनंदऋषीजी नेत्रालयाचे दृष्टी देण्याचे कार्य नेत्रदीपक आहे, असे प्रतिपादन सीए प्रणेश शेटीया यांनी केले आहे.


### मोबाईल ॲम्बुलन्स व्हॅनचे लोकार्पण

आनंदऋषीजी नेत्रालयास शेटीया परीवाराच्यावतीने मोबाईल ॲम्बुलन्स व्हॅनचा लोकार्पण सोहळा पार पडला. याप्रसंगी श्रीमती सीमा शेटीया, सीए प्रणेश शेटीया, सीए सौ.सलोनी शेटीया, कु.प्रतीक्षा शेटीया व शेटीया, अजित शेटीया, अभय शेटीया, मनीष शेटीया, दीपक शेटीया, महावीर शेटीया, सिद्धार्थ शेटीया, सुहित शेटीया, निलेश छाजेड, सौ.सारिका छाजेड, सौ.सारिका पारख, गणेश कांकरिया, गौतम चोरडिया, राजेंद्र तातेड, धन्यकुमार बरमेचा, अमोद बोथरा व मित्र परीवार, जैन सोशल फेडरेशनचे संतोष बोथरा, डॉ.प्रकाश कांकरिया, डॉ.वसंत कटारिया, माणकचंद कटारिया, सतीश लोढा, वसंत चोपडा, डॉ.आशिष भंडारी, सुभाष मुनोत, प्रकाश छल्लाणी, नेत्रालयाचे प्रशासकीय अधिकारी डॉ.आनंद छाजेड आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात संतोष बोथरा म्हणाले, आनंदऋषीजी नेत्रालयाच्या वतीने गेल्या सात वर्षात १ लाख २५ हजार मोतीबिंदू शस्त्रक्रिया मोफत करण्यात आले आहेत. ग्रामीण भागातील झोपडीतील रुग्ण हॉस्पिटलमध्ये आणून मोतीबिंदू शस्त्रक्रिया केल्या जातात. त्यांना ने आण करण्यासाठी बसची व्यवस्था करण्यात आली आहे. अहिल्यानगर जिल्ह्यासह शेजारील पाच जिल्ह्यातील रुग्ण नेत्रालयाच्या शिबिरांचा लाभ घेत असतात. शेटीया परिवाराने नेत्रालयाला मोबाईल ॲम्बुलन्स व्हॅन देऊन स्वर्गीय लक्ष्मीकांत मिश्रीलाल शेटीया यांच्या स्मृती जपल्या आहेत. मोबाईल व्हॅन मुळे नेत्रालयाच्या कामास गती मिळेल. शेटीया परिवाराच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. शेटीया परिवाराने केलेल्या सामाजिक कार्याची प्रेरणा सर्व समाजाला मिळेल. रुग्ण सेवा हीच खरी ईश्वर सेवा समजून शेटीया परिवाराने सामाजिक बांधिलकी जपली आहे. डॉ.आशिष भंडारी यांनी सूत्रसंचालन केले. प्रकाश छल्लाणी यांनी आभार मानले.

# निरामय

## प्रोटीन वाढल्याचा किडनीवर दुष्परिणाम



किडनी हा शरीराचा महत्त्वाचा भाग आहे. पण खाण्यापिण्याच्या चुकीच्या सवयी आणि बिघडलेल्या जीवनशैलीमुळे या अवयवासंबंधी अनेक आजार होऊ लागतात. शरीरात प्रोटीनची पातळी वाढली तरी किडनी खराब होऊ शकते. याविषयी अधिक जाणून घेणे गरजेचे आहे.

एखाद्या व्यक्तीच्या शरीरातील प्रथिनांची पातळी वाढली तर किडनीवर दबाव वाढू शकतो. त्यामुळे किडनीच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो. मूत्रपिंडाचे कार्य मंदावल्यामुळे शरीरातील टाकाऊ पदार्थ बाहेर काढण्यात अडचण येते. किडनी खराब होते. साधारणपणे आहारात जास्त प्रथिने घेतल्याने शरीरातील प्रथिनांची पातळी वाढते. म्हणूनच मूत्रपिंड निकामी होण्याची लक्षणे दिसताच डॉक्टर 'केएफटी' चाचणी करण्याची शिफारस करतात. त्यामध्ये शरीरातील प्रोटीनच्या पातळीविषयी नेमकेपणाने समजते.

**प्रथिनांची पातळी किती असावी?**

शरीरातील प्रथिनांची सामान्य पातळी ६.४ ते ८.३ ग्रॅम/डीएल (डेसीलिटर) असते. ते ८.३ ग्रॅम/डीएलपेक्षा जास्त असेल तर उच्च प्रथिने मानले जाते. यामुळे स्नायू कमकुवत होणे, थकवा जाणवणे, किडनीचा त्रास आणि हृदयविकाराचा धोका वाढतो. म्हणूनच लघवी करताना जळजळ होत असेल, पाठदुखी आणि सतत अशक्तपणा जाणवत असेल तर त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

**प्रथिनांची पातळी कशी नियंत्रित करावी?**

शरीरातील प्रथिनांची पातळी नियंत्रित ठेवण्यासाठी आहारात धान्य, फळे आणि भाज्यांचे सेवन करा. प्रथिनांचे अतिरिक्त प्रमाण कमी करण्यासाठी आहारात प्रथिनयुक्त पदार्थांचे प्रमाण मर्यादित करा. म्हणजेच हा त्रास असेल तर अंडी, मासे आणि कडधान्ये जास्त प्रमाणात खाणे टाळा. नियमित व्यायामामुळे प्रथिनांची पातळी नियंत्रित राहण्यास मदत होते. यासाठी दररोज किमान अर्धा तास व्यायाम करणे गरजेचे आहे. पुरेशा प्रमाणात पाण्याचे सेवन केल्यासही प्रथिनांची पातळी नियंत्रित राखण्यास मदत होते. दररोज किमान आठ ग्लास पाणी पिणे महत्त्वाचे आहे.

आरोग्यचर्चा

डॉ. अजिंक्य बोऱ्हाडे

## तीव्र उष्णतेने वाढलेल किडनी स्टोनचे रुग्ण



उन्हाळ्यात तापमान झपाट्याने वाढत असताना, किडनीशी संबंधित आजारांमध्ये, विशेषतः किडनी स्टोन आणि मूत्रमार्गातील संसर्ग यामध्ये लक्षणीय वाढ दिसून आली आहे. ही वाढ प्रामुख्याने शरीरातील पाण्याची कमतरता (डिहायड्रेशन), जास्त घाम येणे आणि पुरेसे पाणी न पिणे यामुळे होत आहे.

उन्हाळ्यात शरीरातून घामाद्वारे अधिक प्रमाणात द्रव बाहेर जातो. ही कमतरता पुरेशा पाण्याने भरून न काढल्यास शरीर डिहायड्रेट होते आणि लघवीचा रंग दाटसर पिवळा दिसतो. यामुळे खनिजे आणि क्षारांचे स्फटिक स्वरुपात रुपांतर होते. यामुळे किडनी स्टोन तयार होण्याची शक्यता वाढते. कमी पाणी पिणे आणि प्रायव्हेट भागाच्या स्वच्छतेकडे दुर्लक्ष केल्यास मूत्रमार्गाच्या संसर्गाचा धोकादेखील वाढतो. विशेषतः महिलांमध्ये आणि वृद्धांमध्ये या संसर्गाचे प्रमाण अधिक असते.

उन्हाळ्यात किडनी स्टोनच्या रुग्णांची संख्या वाढली असून यामागचे प्रमुख कारण म्हणजे जास्त घामामुळे होणारे डिहायड्रेशन. त्यात मुतखडा तयार होतो. शरीरात पुरेसे पाणी नसल्यास लघवीतील खनिजे आणि क्षार स्फटिकरूप धारण करतात आणि त्यामुळे मुतखडा तयार होण्याची शक्यता वाढते. त्याचबरोबर, कमी पाणी पिल्यामुळे लघवीचे प्रमाण घटते. त्यामुळे बॅक्टेरिया वाढण्यास अनुकूल वातावरण तयार होते आणि मूत्रमार्गातील संसर्ग वाढतो.


सध्या किडनी स्टोन आणि मूत्रमार्गातील संसर्गाच्या रुग्णांमध्ये ४५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. दर महिन्याला २५-५५ वयोगटातील १० रुग्णांपैकी सुमारे २ जणांना मूतखडा तर २-३ रुग्णांमध्ये मूत्रमार्गाचा संसर्ग आढळतो. रुग्णांमध्ये सामान्यतः कमरेच्या खालच्या भागात किंवा बाजूला तीव्र वेदना होतात, लघवी करताना जळजळ होते, वारंवार लघवी लागणे, ताप आणि अस्वस्थता अशी लक्षणे दिसतात. वेळीच उपचार न केल्यास किडनी स्टोनमुळे लघवीच्या मार्गात अडथळा येऊ शकतो किंवा संसर्ग होऊ शकतो, तर दुर्लक्ष केल्यास युटीआय संसर्ग किडनीपर्यंत पसरून गंभीर गुंतागुंत निर्माण होऊ शकते.

लहान स्टोन औषधोपचार आणि जास्त पाणी पिण्याने नैसर्गिकरित्या बाहेर पडू शकतात, तर मोठ्या स्टोनसाठी लेझर उपचार किंवा मिनिमली इन्वेसिव्ह शस्त्रक्रिया करावी लागू शकते. युटीआय संसर्ग हा साधारणतः अँटिबायोटिक्स, पुरेसे पाणी पिणे आणि ठराविक औषधोपचारांनी बरा होतो.

आरोग्यमंत्र

डॉ. शेषराव वानखेडे

## धूम्रपान करत नाही तरी...



सध्या हवेच्या प्रदूषणाचा फुफ्फुसांवर गंभीर परिणाम होत आहे. अनेकांना घसा खवखवणे, वेदना, खोकला आणि श्वास घेताना घरघर (व्हीजिंग) अशा तक्रारी जाणवत आहेत. वाढते हवेचे प्रदूषण फुफ्फुसांच्या आरोग्यावर शांतपणे परिणाम करत आहे आणि धूम्रपान न करणाऱ्या लोकांनाही श्वसनविकारांचा धोका वाढवत आहे.

जड वाहतूक, बांधकाम आणि औद्योगिक कामांमुळे हवेचे प्रदूषण चिंतेचा विषय बनला आहे. आता जे लोक कधीच धूम्रपान करत नाहीत, त्यांनाही खराब हवेच्या गुणवत्तेमुळे फुफ्फुसांचे आजार होत आहेत. प्रदूषित हवेमधील अतिसूक्ष्म घातक कण फुफ्फुसांच्या आत खोलवर जाऊन त्वरित लक्षणे न दिसता दीर्घकाळ नुकसान करू शकतात. त्यामुळे जागरूकता आणि प्रतिबंध खूप महत्त्वाचे आहेत. धूम्रपान न करणारे लोकही दररोज प्रदूषित हवेला सामोरे जातात. पीएम २.५ सारखे सूक्ष्म कण, विषारी वायू आणि धूळ श्वसनमार्गाला त्रास देतात आणि हळूहळू फुफ्फुसांची कार्यक्षमता कमी करतात. दीर्घकाळ प्रदूषणाच्या संपर्कात राहिल्यास दमा, क्रॉनिक ब्रॉन्कायटिस आणि अगदी फुफ्फुसांचा कर्करोग होण्याचा धोका वाढतो.

लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि आधीपासून काही आजार असलेले रुग्ण अधिक संवेदनशील असतात; पण धूम्रपान न करणारे निरोगी प्रौढही खराब हवेच्या गुणवत्तेमुळे श्वसनाच्या समस्यांना बळी पडू शकतात. घरात अगरबत्तीचा वापर, स्वयंपाकाचा धूर, कमी वायुवीजन (व्हेंटिलेशन) आणि सेकंड-हँड स्मोकमुळे घरातील हवेची गुणवत्ता खराब होऊन फुफ्फुसांना हानी पोहोचू शकते. खोकला, श्वास लागणे, घरघर किंवा वारंवार श्वसनाचे इन्फेक्शन ही लक्षणे दिसल्यास ती दुर्लक्षित करू नयेत. फुफ्फुसांचे संरक्षण करणे अत्यंत आवश्यक आहे.

आरोग्यचर्चा

डॉ. महेश दळे

## शहरात वजनावर नियंत्रण ठेवणे अधिक अवघड



सध्या वेगाने होणारे शहरीकरण, बसून राहण्याची सवय आणि बदललेली आहार पद्धत यामुळे शहरात राहणाऱ्या लोकांसाठी वजन नियंत्रण करणे अधिकाधिक कठीण होत आहे. त्यामुळे लठ्ठपणावर नियंत्रण ठेवणे आणि एकूण आरोग्य सुधारण्यासाठी आता तातडीने पावले उचलणे गरजेचे झाले आहे.

शहरी भारतात लठ्ठपणा झपाट्याने वाढत आहे आणि तो मोठा सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न बनत आहे. लहान मुलांपासून ते प्रौढ आणि ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वजण याचा सामना करत आहेत. जलद जीवनशैली, दीर्घ कामाचे तास आणि जास्त कॅलरी असलेले अन्न सहज उपलब्ध असल्याने वजन आटोक्यात ठेवणे कठीण झाले आहे. अनेकांना वाढलेले वजन कमी करणे आव्हानात्मक वाटते. लठ्ठपणा फक्त दिसण्यापुरता मर्यादित नसून, तो मधुमेह, हृदयविकार आणि उच्च रक्तदाब यांसारख्या गंभीर आजारांचा धोका वाढवतो. त्यामुळे वजन कमी करणे कठीण का होत आहे आणि त्यावर उपाय काय हे समजून घेणे आवश्यक आहे.

शहरातील अनेक लोक दिवसभर ऑफिसमध्ये बसून काम करतात, वाहतुकीत वेळ घालवतात आणि शारीरिक हालचाल कमी असते. त्यामुळे शरीराचा मेटाबॉलिझम कमी होतो आणि चरबी साचू लागते. बसून राहण्याची सवय वजन कमी होण्यास अडथळा ठरते. अयोग्य आहार ही आणखी एक मोठी समस्या आहे. अनेकजण प्रोसेस्ड, पॅकेज्ड आणि हॉटेलमधील अन्न खातात. त्यात साखर, अनारोग्यदायी फॅट्स आणि मीठ जास्त असते. यामुळे शरीरात अनावश्यक कॅलरीज वाढतात; पण पोषण मिळत नाही. वारंवार खाणे आणि अनियमित जेवणाच्या वेळेमुळेही मेटाबॉलिझम बिघडतो आणि वजन वाढते.

तणाव हा देखील वजन वाढण्यामागील महत्त्वाचा घटक आहे. कामाचा ताण, आर्थिक जबाबदाऱ्या आणि शहरी जीवनशैलीमुळे तणाव वाढतो. यामुळे भावनिक खाणे वाढते आणि हार्मोन्समध्ये बदल होऊन वजन वाढते. अनियमित झोप, उशिरापर्यंत मोबाईल किंवा स्क्रीनचा वापर आणि शिफ्टमध्ये काम करणे यामुळे भूक आणि तृप्ती नियंत्रित करणारे हार्मोन्स बिघडतात. त्यामुळे जास्त खाण्याची शक्यता वाढते. तसेच, व्यायामासाठी कमी मोकळी जागा आणि वाढते प्रदूषण यामुळे लोक बाहेर जाऊन शारीरिक हालचाल करण्यास टाळाटाळ करतात. काही लोकांमध्ये आनुवंशिक कारणेही लठ्ठपणाला कारणीभूत ठरतात.

योग्य वजन कसे राखावे?

*लठ्ठपणावर नियंत्रण मिळवण्यासाठी मोठे बदल करण्याची गरज नाही, तर छोटे पण नियमित बदल महत्त्वाचे आहेत.

*शक्यतो घरचे, कमी तेलातील आणि संतुलित अन्न खा.

*आहारात फळे, भाज्या आणि संपूर्ण धान्यांचा समावेश करा.

*दररोज किमान ४५ मिनिटे चाला.

*योग, ध्यान किंवा छंदांच्या मदतीने तणाव कमी करा.


*दररोज ७- ८ तासांची चांगली झोप घ्या.

*पुरेसे पाणी प्या.

जाणून घ्या

डॉ. कुंदन गायकवाड

## 'प्री मॅच्युअर ओव्हेरियन फेल्युअर'मध्ये वाढ



महिलांच्या आरोग्याबाबत एक धक्कादायक बाब समोर येत आहे. २५ ते २६ वयोगटातील महिलांमध्ये 'प्री मॅच्युअर ओव्हेरियन फेल्युअर' (पीओएफ) सारखी समस्या आढळून येते.

स्त्रियांच्या शरीरात विशिष्ट प्रमाणात स्त्रीबीज असतात. प्रत्येक मासिक पाळी वेळी एक स्त्री बीज तयार होते आणि गर्भधारणा नाही झाल्यास ते मासिक पाळीच्या माध्यमातून शरीराबाहेर जाते; मात्र जेव्हा मासिक पाळी जाते तेव्हा सर्व स्त्री बीज संपते. कमी वयात असे झाल्यास त्याला 'प्री मॅच्युअर ओव्हरीयन फेल्युलर' म्हणतात. अशा समस्येने त्रस्त दर महिन्याला सुमारे ३- ४ नव्या रुग्णांची नोंद होत असून, वेळीच जागरूकता आणि उपचाराची गरज आहे.

सामान्यतः हा वयोगट उत्तम प्रजननक्षमता असलेला वयोगट म्हणून ओळखला जातो; मात्र बदलती जीवनशैली, वाढता ताणतणाव आणि काही अंतर्गत वैद्यकीय कारणांमुळे अंडाशयांच्या आरोग्यावर नकारात्मक परिणाम होत असल्याचे डॉक्टरांचे म्हणणे आहे. 'प्री मॅच्युअर ओव्हेरियन फेल्युअर'ला 'अर्ली ओव्हेरियन इन्सफिशियन्सी' असेही म्हटले जाते. ही अशी स्थिती आहे, ज्यात ४० वर्षांपूर्वीच अंडाशयाचे कार्य कमी होते किंवा थांबते. यामुळे अंड्यांची निर्मिती कमी होते किंवा थांबते आणि इस्ट्रोजेन हार्मोनची पातळी घटते. याचा परिणाम प्रजननक्षमतेवर तसेच संपूर्ण हार्मोनल संतुलनावर होतो. नैसर्गिक मेनोपॉजपेक्षा ही स्थिती वेगळी असली, तरी गर्भधारणेवर याचा मोठा परिणाम होतो.


या आजारामागील कारणांमध्ये आनुवंशिकता किंवा कौटुंबिक इतिहास, ऑटोइम्यून विकार (ज्यात शरीर स्वतःच्या अंडाशयांवर हल्ला करते), आहाराच्या चुकीच्या सवयी, व्यायामाचा अभाव, धूम्रपान, वाढलेला ताणतणाव, अनियमित झोप, पर्यावरणीय घटक, विषारी पदार्थांचा संपर्क तसेच केमोथेरपी किंवा रेडिएशनसारखे उपचार यांचा समावेश होतो. 'प्री मॅच्युअर ओव्हेरियन फेल्युअर' आजाराच्या लक्षणांमध्ये मासिक पाळी अनियमित होणे किंवा बंद होणे, गर्भधारणेत अडचणी येणे, हॉट फ्लॅशेस व रात्री घाम येणे, मूड स्विंग्ज व चिडचिड, योनी मार्गाचा कोरडेपणा आणि लैंगिक इच्छेत घट यांचा समावेश होतो.

गेल्या काही महिन्यांमध्ये २५ ते २६ वयोगटातील ३ ते ४ तरुण महिलांमध्ये 'प्री मॅच्युअर ओव्हेरियन फेल्युअर'च्या लक्षणांचे निदान होत आहे. पूर्वी या वयोगटात अशी प्रकरणं अपेक्षित नव्हती. हा आजार मानसिकदृष्ट्याही तणावास कारणीभूत ठरतो.

'ती'चे आरोग्य

डॉ. मेघा पठारे

## 'फबिंग'मुळे वाढतो दुरावा



सध्या 'फबिंग' हा ट्रेंडिंग शब्द इंटरनेटवर वेगाने व्हायरल होत असून तो 'फोन' आणि 'इग्नोरिंग'या दोघांच्या एकत्रिकरणातून बनला आहे. एखादी व्यक्ती जोडीदाराच्या भावनांकडे दुर्लक्ष करून फोनला प्राधान्य देते तेव्हा एकमेकांमध्ये नकारात्मकता निर्माण होते.

एकमेकांबरोबर असतानाही जोडीदार स्क्रोल, चॅट करण्यात किंवा सोशल मीडियावर व्यस्त राहतो तेव्हा त्याला 'फबिंग' म्हणतात. आजकाल ही बाब अनेकांना सामान्य वाटत असली तरी यामुळे हळूहळू भावनिक अंतर वाढू शकते आणि जोडीदाराला एकटे वाटू शकते. त्यामुळेच ही समस्या दुर्लक्षित करण्याजोगी नाही, हे लक्षात घ्यायला हवे.

**नातेसंबंधांवर 'फबिंग'चे परिणाम**

मानसशास्त्रीयदृष्ट्या बघायचे तर एखादी व्यक्ती फोनमुळे जोडीदाराकडे वारंवार दुर्लक्ष करते तेव्हा दुसऱ्याचा स्वाभिमान दुखावू शकतो. यातून तणाव, संघर्ष निर्माण होतो तसेच नातेसंबंधाची गुणवत्ता घसरू शकते. एका संशोधनानुसार वारंवार 'फबिंग' होत असेल तर संबंधित दोन व्यक्तींमध्ये भांडणे होण्याचे प्रमाण वाढते. अशा नात्यांमध्ये भावनिक ओढ कमी होते आणि कधीकधी ते ब्रेकअप किंवा घटस्फोटापर्यंत देखील पोहोचू शकते.

जीवनशैली

डॉ. सतीश सोनवणे

**'फबिंग' टाळण्याचे मार्ग**

* **फोन-फ्री वेळ सेट करा:** जोडीदाराबरोबर क्वॉलिटी टाईम घालवण्यासाठी काही काळ फोन सायलेंट मोडवर ठेवा.
* **संवाद वाढवा:** जोडीदार तुमच्याकडे दुर्लक्ष करत आहे, असे वाटत असेल तर त्यांच्याशी मोकळेपणाने बोला आणि तुम्हाला काय वाटते ते समजावून सांगा.
* **डिजिटल डिटॉक्सचा अवलंब करा:** दररोज फोन बाजूला ठेवून एकमेकांबरोबर काही वेळ घालवा.
* **एकमेकांना प्राधान्य द्या:** नात्यात आदर आणि प्रेम राखणे महत्त्वाचे असते. म्हणूनच फोनपेक्षा समोरच्या व्यक्तीला जास्त महत्त्व द्या.
* 'फबिंग' ही एक धोकादायक सवय बनत चालली असून ती नातेसंबंधांवर परिणाम करत आहे. हे वेळीच थांबवले नाही तर नाते कमकुवत होऊ शकते. म्हणूनच स्मार्टफोनपेक्षा जोडीदाराकडे जास्त लक्ष द्या आणि नाते अधिक मजबूत करा.

नवसंशोधन



### केसगळती आणि प्रदूषण

प्रदूषणामुळे केस गळण्याचं प्रमाण वाढू लागलं आहे. महिलाच नाही तर पुरुषांनाही केस गळण्याच्या समस्येने ग्रासलं आहे. प्रदूषित कणांच्या सततच्या संपर्कामुळे केसांच्या वाढीला कारक ठरणाऱ्या प्रथिनांचं प्रमाण घटतं आणि केस गळू लागतात. दक्षिण कोरियातल्या एका कंपनीने केलेल्या एका अभ्यासातून ही बाब समोर आली आहे. या अभ्यासातून केस गळणं आणि प्रदूषण यांचा संबंध दर्शवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. म्हणूनच शहरी भागातल्या लोकांमध्ये केसगळतीचं प्रमाण वाढल्याचं पहायला मिळतं.

दंतारोग्य

### गैरसमज नको

अनेकजण रूट कॅनाल करून घेतात. या उपचारपद्धतीबाबत काही समज आणि गैरसमज आहेत. रूट कॅनाल ही वेदनादायी प्रक्रिया आहे. त्यामुळे अनेकांना रूट कॅनालची भीती वाटते. मात्र रूट कॅनाल करताना दातांचा काही भाग बधीर केला जातो. यामुळे वेदनांची फारशी जाणीव होत नाही. त्यामुळे रूट कॅनालबाबतचे गैरसमज दूर करून या प्रक्रियेला सामोरं जायला हवं.



डोळ्यांचे आरोग्य

### डोळा फडफडतोय?



डोळा फडफडणं हा अनेकांना अशुभ संकेत वाटतो. पण प्रत्यक्षात डोळा फडफडण्याचा संबंध ताण किंवा शारीरिक व्याधीशी असू शकतो. डोळ्याच्या स्नायूवर ताण आला की तो फडफडू लागतो. डोळ्याचे स्नायू आता थकले आहेत किंवा त्यावर ताण आला आहे हे सांगण्यासाठी शरीर या पद्धतीचा अवलंब करतं. अपुरी झोप, सतत कॉम्प्युटरपुढे बसून रहाणं, मोबाईल फोनचा अतिवापर, कॅफेनचं अतिसेवन यामुळेही डोळा फडफडू शकतो.

आजीबाईचा बटवा

### आल्याचा चहा प्या

आल्याचा चहा औषधी आहे. आल्याचा चहा प्यायल्याने बरेच लाभ होतात. आल्याच्या चहामुळे वजन कमी व्हायला मदत होते. त्यामुळे वजन कमी करणाऱ्यांनी आहारात आल्याच्या चहाचा समावेश करायला हवा. आलं घातलेल्या चहामुळे रक्तातली साखर नियंत्रणात रहाते. शिवाय हा चहा प्यायल्यानंतर पोट बराच काळ भरलेलं रहातं आणि खाण्यावर नियंत्रण रहातं. आल्याच्या चहामुळे पचनशक्ती सुधारते, रोगप्रतिकारशक्ती वाढते. शरीराचा दाह कमी होतो.



# महागडे नगरसेवक, महागडी गैरहजरी, महासभा तहकूब करायची महानामुष्की..

## अजब तुझे सरकार, नागरिक उपाशी.. महासभेची ऐशी तैशी

प्रति,
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई.,
सचिव नगर विकास महाराष्ट्र शासन,
मुंबई., जिल्हाधिकारी अहिल्यानगर.,
आयुक्त अहिल्यानगर महानगरपालिका.
महोदय,

संपूर्ण देश सध्या सामाजिक, आर्थिक आणि मूलभूत समस्यांबाबत अभूतपूर्व संकटातून जात असताना, लोकशाहीचा ढाचा योग्य पद्धतीने चालावा म्हणून समाजाच्या खालच्या तळापासून थेट संसदेपर्यंत हजारो कोटी रुपयांचा खर्च करून निवडणुका घेतल्या जातात आणि पात्र-अपात्र सगळ्या प्रकारचे पात्रं लोकप्रतिनिधी म्हणून खुर्चीवर बसवले जातात. आणि एकदा का खुर्चीवर बसले की आपल्याला पाच वर्ष कोण हलू शकणार आहे, या लोकशाहीच्या बेन्टेक्स च्या कवच कुंडलामुळे विकास, जबाबदारी समाजसेवा हे शब्द हास्यस्पद ठरवायचं काम हेच लोकप्रतिनिधी करत असतात. त्याचं स्पष्ट उदाहरण म्हणजे महानगरपालिकेची गणपूर्ती अभावी रद्द झालेली महासभा! आणि त्याहून हास्यास्पद म्हणजे आयुक्तांनी केलेले केविलवाणं, हतबल हास्यास्पद विधान की सध्या लग्न समारंभ चालू आहेत, वगैरे वगैरे.. निवडून आलेल्या नगरसेवकांनी महासभेकडे पाठ का फिरवली हे एक ओपन सिक्रेट आहे.. त्या पाठीमागची रंगीबेरंगी कारणं सगळ्यांना माहित आहे. आपल्या गुप्त बातम्या काढणाऱ्या कार्यक्षम यंत्रणेद्वारे हे सगळं आपल्या शासनाला समजतच असेल पण दुर्दैव असे की शासनालाही काहीच करावेसे वाटत नाही.

निवडणुका म्हणजे आयपीएलचा बैल बाजारच झालेला आहे. कोण किती पैसे खर्च करून निवडून आला? आणि कोण किती पैशाला विकला गेला,? फक्त याच्या निर्लज्ज चर्चा बेजबाबदार मतदारांकडुन होत असतात. त्यामुळे ज्यांनी ज्यांनी यावेळी एका एका मताला पाच पाच हजार रुपये छापील गांधीजींना हळूच खिशात घेतलेले आहेत, त्यांना आता या बेजबाबदार लोकप्रतिनिधींवर बोलायचा काही अधिकारच राहत नाही, कारण या बैल बाजारातला कोणता बैल त्यांनी या पाच हजारात घरात घुसवुन घेतलेला आहे, त्याच्या लाथा आणि शिंगं पाच वर्ष खुपसून घेणं त्यांना क्रमप्राप्तच आहे.

अनेक वाईट कृत्यां बाबत इतिहास घडवणाऱ्या या ऐतिहासिक नगर महानगरपालिकेच्या कर्तुत्वामुळे ती सर्व दूर सदैव चर्चेत राहिली आहे. कधी दोन दोन महापौर, कधी दोन दोन आरोग्य अधिकारी, कधी दोन दोन विरोधी पक्ष नेते, तर कधी विरोधी पक्ष नेताच नाही, तर कधी कधी सत्ताधारी तोच आणि विरोधी पक्ष नेता ही तोच..अशा अभूतपूर्व घटना फक्त नगरमध्येच घडू शकतात.

पावसाळा तोंडावर येऊन उभा आहे, अनेक कामं रखडलेली आहेत, पाहिजे तिथे आणि नको तिथे काँक्रीटचा मलिदा रस्त्यावरच्या नावाखाली ओतला गेलेला आहे, तो ओतताना पण एकूण एक ठिकाणी मोठे मोठे पॅचेस आणि हास्यास्पद चढ-उतार सोडून दिलेले आहेत, कदाचित पावसाचे पाणी साठण्यासाठी... अशा सगळ्या अर्धवट कामांचं काय करायचं याचा निवडून आलेल्या नगरसेवकांनाच तपास नाही, कारण त्यांना कुठल्याच बाबतीत जर विश्वासातच (?) घेतलं जात नाही, कुठलेही निर्णय घेताना सहभागी करून घेतलं जात नाही (?), अशा चर्चा कानावर येतात आणि अनेक नगरसेवक खाजगी मध्ये दबक्या आवाजात या वेळी निवडून येण्यासाठी, मतं विकत घेण्यासाठी केलेला प्रचंड खर्च आणि उलथापालथ केल्याबद्दल एकंदर पश्चाताप आणि नाराजीच व्यक्त करत आहेत. कारण मतं विकत घेताना, त्यांनी पक्षाच्या मतं विकत घेणे निधी बरोबरच स्वतःच्या खिशातला खर्च झालेला प्रचंड पैसा, आता निवडून आल्यावर पटापट वसूल व्हायची कुठली चिन्ह दिसत नाहीत.

लाख रुपयाची होस्टन गाय विकत घेतली आणि ती थेंब भर दूधच देईना, बऱ्याच जणांना आपण पहिल्यांदा कोणत्या पक्षात होतो? आता कोणत्या पक्षात आहोत? आणि आता कोणता इस्टमनकलर झेंडा हातात धरून, हिंदुत्ववाद, बंधुत्ववाद, नांदुत्ववाद का बंदूक वाद? यापैकी नेमके कोणते आदर्श विकास विचार पुढे न्यायचे आहेत? याचा अभ्यास करायलाच पाच वर्षे लागतील, हे विश्व जसे त्रिदेव ब्रह्मा विष्णू आणि महेश चालवतात तसे आमच्या पाचवीला पुजलेले त्रिदेव वॉटर, मीटर, गटर असे मुलभुत विकासवादी शब्द आता कुठल्याही नागरिकांनी तोंडातून काढूच नये का?

राजाने मारले आणि पावसाने झोडपले तर तक्रार कोणाकडे करायची? मांजराच्या गळ्यामध्ये घंटा कोणी बांधायची? हे यक्षप्रश्न या बिचाऱ्या नगरसेवकांच्या समोर उभे असावेत, म्हणून त्यांनाही दोष देऊ नये, आई जेवायला देत नाही आणि बाप भीक मागू देत नाही अशी अवस्था आहे. या सगळ्या मनपा मानापमान नाटकांमध्ये भरडला जातो आहे, तो प्रामाणिक कर भरणारा, पैसे न घेता मतदान केलेला जबाबदार नागरिक!! ही अवस्था फार वेळ टिकेल असे वाटत नाही कारण संताप, अस्वस्थता याचा फुगा कधीतरी फुटतोच, आता तरी शासनाने नुसत्या कागदी योजना आणि कोटीच्या कोटी निधीच्या कागदी घोषणा आणि बॅनरबाजी थांबवून आम्ही नगरकर पण विकसनशील भारतात आहोत याची आम्हाला जाणीव करून द्यावी, अशी नम्र विनंती आहे. नाहीतर फारच अन्याय झाला तर एक छोटीशी मुंगी हत्तीला सुध्दा कडकडून चावा घेते.. आणि मुख्य म्हणजे ती मुंगी कानात गेली तर हत्ती मरू शकतो. हे या सुजलेल्या या लोकशाही नावाच्या हत्तीने लक्षात घ्यायला आहे.

नगरकर तसे पूर्वीपासून दुर्दैवीच.. जग कुठे चालले आहे? जवळच्या विकसित शहरांबरोबर असलेली कनेक्टिव्हिटी, रस्ते, इन्फ्रास्ट्रक्चर, हे तर फारच मोठे विषय झाले, आम्हाला इथे अजून नदी नाले ओढे, यांचा मोकळा श्वास, एकुलती एक सीना नदी, गटार, पाणी अमृत योजना फेज वन, फेज टू.. याचाच कागदी निपटारा होईना, तर प्रत्यक्षात कधी होणार?

ठेविले अनंत तैसेच राहावे.. चित्ती असू द्यावे समाधान याचं मूर्तीमंत उदाहरण म्हणजे आम्ही नगरकर ज्यांना निवडून दिले तेच हतबल दिसतात.. त्यामुळे कदाचित ते निदान स्वतःच्या मनोरंजनासाठी लग्न कार्य, दहावा, बारावा, त्यालाच पहिलं प्राधान्य देत असावेत. महासभेची ऐशीतैशी.

**– सुहासभाई मुळे,**
**अध्यक्ष – जागरूक नागरिक मंच,**
**अहिल्यानगर**

# सभा तहकूब करण्यामागे गौडबंगाल काय?

## दीप चव्हाण यांचा सवाल; नवीन रस्ता भूसंपादन की कर्ज मागणी?



नगर – अहिल्यानगर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा ही जनतेच्या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी असते. पण आज पुन्हा एकदा प्रशासन आणि सत्ताधाऱ्यांच्या गलथान, बेजबाबदार आणि संशयास्पद कारभारामुळे सभा तहकूब करण्याची वेळ आली आहे. विशेषतः विषय क्रमांक १७, २० आणि २२ हे विषय अत्यंत वादग्रस्त असून त्यामध्ये मोठ्या आर्थिक व्यवहारांचा आणि कर्ज प्रस्तावांचा समावेश आहे. त्यामुळेच या विषयांवर पारदर्शक चर्चा होण्याऐवजी सभा तहकूब करण्यात आली, ही अत्यंत गंभीर बाब आहे.

विषय क्रमांक १७ नुसार बोल्हेगाव ते अमरधाम असा नवीन रस्ता करण्याचा प्रस्ताव सीना नदी पात्राला लागून तयार करण्यात आला आहे. या रस्त्याच्या आसपास जमिनी शेतकऱ्यांकडून अगोदर विकत घेतला गेल्या आणि आता त्या रस्त्यावर नवा रस्ता करण्याचा घाट घालण्यात आला त्यातून कोणाचे उखळ पांढरे होणार आहे. हा विषय इतर विरोधी नगरसेवकांना समजल्यानंतर त्याला विरोध होण्याची दाट शक्यता आहे. आणि जर विरोध झाला तर हा विषय तहकूब देखील होऊ शकतो. आणि केलेल्या मेहनतीवर पाणी फिरू शकते. तसेच

अहिल्यानगरकरांच्या पैशांवर चालणाऱ्या महानगरपालिकेत नेमकं काय लपवलं जात आहे? व्यापारी संकुल, बाजार प्रकल्प आणि कोट्यवधींच्या कर्ज प्रस्तावांबाबत प्रशासन एवढं घाईत का आहे? जनतेच्या हिताचे निर्णय घ्यायचे असतील तर खुली चर्चा होणं आवश्यक आहे. पण इथे चर्चा टाळली जाते, प्रश्न दाबले जातात आणि विरोधकांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केला जातो.

अहिल्यानगर महानगरपालिकेत सुरू असलेला हा मनमानी कारभार आम्ही सहन करणार नाही. जनतेच्या पैशांचा हिशोब द्यावाच लागेल. प्रत्येक प्रस्तावाची चौकशी झाली पाहिजे आणि जे अधिकारी किंवा पदाधिकारी या गोंधळाला जबाबदार आहेत त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. महानगरपालिका ही कोणाची खासगी कंपनी नाही. ही जनतेची संस्था आहे आणि जनतेसमोर सत्य येईपर्यंत काँग्रेस पक्ष संघर्ष करत राहील, असे दीप चव्हाण यांनी प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

# गाळे वाटपावरून भाजप-राष्ट्रवादीत वाद झाल्याने मनपाची सभा तहकूब

## किरण काळेंचा दावा; सत्ता दोघांची, पण भाजपला कवडीची किंमत नाही



नगर – महानगरपालिकेची नियोजित सर्वसाधारण सभा अचानक तहकूब झाल्याने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. सुमारे ११४ कोटी रुपयांच्या कर्जातून उभारण्यात येणाऱ्या पाच व्यापारी संकुलांमधील कमर्शियल गाळ्यांच्या वाटपाचा मलिदा कोणी किती खायचा, यावरून सत्ताधारी राष्ट्रवादी आणि भाजप नगरसेवकांमध्ये जोरदार वाद झाला. या तू-तू, मैं-मैं मुळेच सभा तहकूब करण्याची नामुष्की ओढावली, असा दावा ठाकरे शिवसेनेचे महानगरप्रमुख किरण काळे यांनी केला आहे. सभा रद्द झाल्याने काही भ्रष्ट अधिकारी आणि राज्याश्रय लाभलेल्या ठेकेदारांचा मोठा हिरमोड झाल्याचेही ते म्हणाले.

मनपा आयुक्त यशवंत डांगे यांनी लग्नसराईचे कारण देत सभा रद्द झाल्याचा खुलासा केला होता. हा खुलासा धादांत खोटा असल्याचे सांगत किरण काळे यांनी आयुक्तांवर निशाणा साधला. आयुक्त अजून किती दिवस लिहून दिलेले स्क्रिप्ट वाचणार आहेत? ते मनपाचे आयुक्त आहेत की कुण्या एका राजकीय नेत्याचे प्रवक्ते? असा संतप्त सवाल काळे यांनी उपस्थित केला आहे.

किरण काळे यांनी अंतर्गत घडामोडींचा पर्दाफाश करताना सांगितले की, गुरुवारी रात्री उशिरा सावेडी येथे एका भाजप पदाधिकाऱ्याच्या घरी सत्ताधारी नगरसेवकांची एक अनौपचारिक बैठक पार पडली. पाच व्यापारी संकुलांमध्ये कर्ज काढून लाखो स्क्वेअर फूटचे शेकडो कमर्शियल गाळे बांधण्याचा सत्ताधाऱ्यांचा डाव आहे. मात्र, हे गाळे बांधण्यापूर्वीच भाजप नगरसेवकांना राष्ट्रवादीपेक्षा जास्त गाळे आणि त्याचा मलिदा हवा आहे. दुसरीकडे, आमदार आमचा असल्यामुळे आम्हाला जास्त गाळे हवेत, असा दावा राष्ट्रवादीने केला. यावरून बैठकीत जोरदार वादंग निर्माण झाले आणि दोन्ही बाजूंचे नगरसेवक एकमेकांवर धावून गेले. सत्ताधाऱ्यांना जनतेच्या प्रश्नांशी काहीही देणं-घेणं नसून, निवडणुकीत खर्च केलेले कोट्यवधी रुपये शहराला कर्जाच्या खाईत लोटून वसूल करायचे आहेत, असा गंभीर आरोप काळे यांनी केला.

### स्वाभीमान असेल तर सत्तेला लाथ मारा!

महापालिकेत जरी दोघांची सत्ता असली, तरी राष्ट्रवादीचीच मनमानी सुरू आहे. स्थानिक नेतृत्व भाजपला कवडीचीही किंमत देत नाही. सभेची विषयपत्रिका ठरवताना भाजपला विचारात घेतले जात नाही. पालकमंत्री व माजी खासदारांच्या सुचनांना केराची टोपली दाखवली जाते. टेंडरचा मलिदा फक्त राष्ट्रवादीच्याच कार्यकर्त्यांना मिळतो. भाजपचे नेतृत्व राज्य पातळीवरील असून मुख्यमंत्री पदाच्या शर्यतीतील आहे. जर असा वारंवार अवमान होत असेल, तर स्वाभिमान गहाण ठेवण्यापेक्षा भाजपने अशा सत्तेला लाथ मारली पाहिजे, असा खोचक सल्ला काळे यांनी दिला.

### केवळ अर्थपूर्ण हितसंबंधांनाच प्राधान्य का?

मनपाच्या तिजोरीत खडखडाट असताना जनतेचे प्रश्न सोडवण्याऐवजी कोट्यवधी रुपयांच्या आर्थिक उलाढाली असलेल्या विषयांनाच प्राधान्य का दिले जाते? असा सवाल किरण काळे यांनी केला आहे. पंपिंग स्टेशन उभारणे, सावेडी ते कल्याण रोड-अमरधामपर्यंत ३० मीटर रुंदीच्या रिंग रोडसाठी भूसंपादन, केडगाव येथील सर्व्हे नंबर २०८ मधील जागेचे रस्त्यासाठी भूसंपादन करणे, यापूर्वीच्या निकृष्ट कामांच्या अनामत रकमा ठेकेदारांना परत करणे, बँकांकडून शेकडो कोटींचे कर्ज काढणे, केवळ स्वतःचे आर्थिक हितसंबंध जोपासण्यासाठीच हा सर्व घाट घातला जात असल्याचा घणाघात किरण काळे यांनी केला आहे.

# कर्ज नको, बीओटी तत्वावर व्यापारी संकुले उभारावीत

## महापालिकेच्या कर्ज प्रस्तावावर श्रीपाद छिंदम यांचा आक्षेप



नगर – अहिल्यानगर महापालिकेच्या सर्वसाधारण सभेपूर्वी नगरसेवक श्रीपाद छिंदम यांनी विविध विषयांवर गंभीर आक्षेप नोंदवत प्रशासनाला सविस्तर पत्र दिले आहे. विशेषतः भुयारी गटार योजना टप्पा-२ तसेच व्यापारी संकुले विकसित करण्यासाठी वित्तीय संस्थेकडून कर्ज घेण्याच्या प्रस्तावावर त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. सर्वसाधारण सभेच्या विषय पत्रिकेतील विषय क्रमांक ३, १८, १९, २०, २१ आणि २२ संदर्भात त्यांनी हा विरोध दर्शवला असून संबंधित कर्ज प्रस्ताव नामंजूर करण्याची मागणी केली आहे. तसेच कर्जाऐवजी बीओटी तत्वावर व्यापारी संकुले उभारावीत, अशी मागणीही छिंदम यांनी केली आहे.

याबाबत नगरसेवक छिंदम यांनी नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई, मनपा आयुक्त यशवंत डांगे आणि नगरसचिव यांनाही पत्र पाठवले आहे. या पत्रात म्हटले आहे, शहरातील व्यापारी संकुले उभारण्यामागचा मूळ उद्देश हा शहराचे व्यापारीकरण वाढवणे आणि महानगरपालिकेसाठी कायमस्वरूपी आर्थिक स्त्रोत निर्माण करणे हा असतो. मात्र अशा प्रकल्पांसाठी थेट कर्ज घेणे म्हणजे महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ न होता उलट आर्थिक बोजा वाढवण्यासारखे आहे. सध्या महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती अत्यंत गंभीर असून नियमित पाणीपुरवठ्यासाठी लागणारे वीजबिल भरण्यास देखील आर्थिक अडचणी निर्माण होत आहेत. महावितरणकडून वारंवार वीजपुरवठा खंडित केला जात असल्यामुळे नागरिकांना पाणीटंचाईचा त्रास सहन करावा लागत आहे. याशिवाय कर्मचाऱ्यांचे पगार, पेन्शन तसेच ठेकेदारांची देणी वेळेवर न दिल्याने अनेक वेळा न्यायालयाने मनपाची खुर्ची, टेबल, कपाट जप्त करण्याचे तसेच खाते सील करण्याचे आदेश दिल्याची बाबही त्यांनी पत्रात नमूद केली आहे.छिंदम यांनी मनपाच्या आर्थिक उत्पन्नावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. गेल्या पाच वर्षांच्या अंदाजपत्रकातील कर वसुलीचा आढावा घेतला असता, महानगरपालिकेची वार्षिक वसुली ही १८ कोटी ते २५ कोटी रुपयांच्या दरम्यानच राहिल्याचे त्यांनी स्पष्ट केले. घरपट्टी हा मनपाचा प्रमुख आर्थिक स्त्रोत असताना एवढ्या मर्यादित उत्पन्नातून कोट्यवधी रुपयांचे कर्ज फेडणे शक्य होणार नसल्याचे त्यांनी म्हटले आहे. मनपा प्रशासनाच्या अहवालात केंद्र सरकारच्या विविध योजनांमधून मिळणारा निधी कर्जफेडीसाठी वापरण्याचा उल्लेख करण्यात आला आहे. तसेच व्यापारी संकुले उभारल्यानंतर दुकानदारांकडून मिळणारे नॉन-रिफंडेबल डिपॉझिट आणि मासिक भाडे यातून कर्जफेड शक्य होईल, असे प्रशासनाने नमूद केले आहे. मात्र या संदर्भात कोणताही स्पष्ट प्रोजेक्ट रिपोर्ट सादर करण्यात आलेला नाही, अशी टीका छिंदम यांनी केली.

दुकानदारांकडून मिळणारी डिपॉझिट रक्कम किती असेल, मासिक भाडे किती येईल, कर्जावरील व्याज किती लागेल, हप्ते किती असतील आणि व्यापारी संकुलांमधून प्रत्यक्षात किती उत्पन्न निर्माण होईल याचा कोणताही स्पष्ट आर्थिक आराखडा प्रशासनाने सादर केलेला नाही. मोघम पद्धतीने कर्ज घेण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला असून तो भविष्यात मनपाला आर्थिक संकटात ढकलू शकतो, असेही त्यांनी पत्रात नमूद केले आहे.

भुयारी गटार योजना टप्पा-२ साठी कर्ज घेण्याच्या प्रस्तावालाही त्यांनी विरोध दर्शवला आहे. महानगरपालिकेकडे सध्या कर्ज परतफेडीचा सक्षम स्त्रोत उपलब्ध नाही. त्यामुळे अशा प्रकारे मोठ्या प्रमाणात कर्ज उचलणे धोकादायक ठरू शकते, असे ते म्हणाले.

नगरसेवक श्रीपाद छिंदम यांनी व्यापारी संकुले उभारण्यासाठी पर्यायी उपायही सुचवले आहेत. त्यांनी म्हटले आहे की, ही संकुले बीओटी (बांधा, वापरा आणि हस्तांतरीत करा) तत्वावर उभारल्यास महानगरपालिकेवर कोणताही आर्थिक बोजा पडणार नाही. तसेच बीओटी पर्याय योग्य वाटत नसल्यास राज्य व केंद्र शासनाकडून १०० टक्के निधी उपलब्ध करून घेण्यासाठी प्रयत्न करावेत. महानगरपालिकेला भविष्यात उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण होतील, अशी स्पष्ट आर्थिक धोरणे या प्रस्तावात दिसत नाहीत. त्यामुळे सर्वसाधारण सभेतील विषय क्रमांक ३, १८, १९, २०, २१ आणि २२ मधील कर्ज घेण्याचा प्रस्ताव नामंजूर करण्यात यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# कर्ज आम्ही भरायचे आणि मलिदा मनपाने खायचा?

## घरपट्टी, पाणीपट्टीवरून प्रशासनावर हल्लाबोल करत श्रीपाद छिंदम यांचा सवाल

नगर – शहरातील वाढीव घरपट्टी, भाडेआधारित कर आकारणी आणि प्रस्तावित पाणीपट्टी वाढीच्या मुद्द्यांवरून नगरसेवक श्रीपाद छिंदम यांनी मनपा प्रशासनाच्या धोरणांवर जोरदार आक्रमण केले आहे. १५ मे रोजी होणाऱ्या सर्वसाधारण सभेपूर्वी त्यांनी महापौरांना सविस्तर पत्र पाठवून नागरिकांवर लादण्यात येणारा हा जाचक आर्थिक बोजा तातडीने रद्द करण्याची मागणी केली. दरम्यान, नियोजित महासभा तहकूब झाल्यानंतर नगरसचिवांकडून नगरसेवकांची दिशाभूल करण्यात आल्याचा आरोपही छिंदम यांनी केला आहे.

छिंदम यांनी दिलेल्या पत्रकात म्हटले आहे, प्रशासन घरपट्टी वाढ केलेली नाही असा दावा करत असले तरी तो खोटा आहे. नव्याने केलेल्या मोजमापानुसार नागरिकांना प्रचंड वाढीव नोटिसा येत आहेत. व्हॅल्युएशनच्या २७ टक्के मूळ करावर पथकर २%, ड्रेनेज कर ५%, अग्नी कर २%, शिक्षण कर ५%, वृक्ष कर ०.५% आणि जलमल कर १% अशा विविध करांची सक्तीची भर टाकली जात आहे. त्यामुळे सामान्य नागरिकांवर एकूण ४२ ते ४३ टक्क्यांपर्यंत कराचा बोजा पडत असून व्यावसायिक गाळे आणि दुकानदारांसाठी ही आकारणी तब्बल ५१ टक्क्यांपर्यंत पोहोचली असल्याचा आरोप छिंदम यांनी केला.

सामान्य नागरिक आयुष्यभराची कमाई खर्च करून, बँकेचे कर्ज काढून घर बांधतो. कर्जाचा भार हलका व्हावा म्हणून एखादी खोली भाड्याने दिली, तर मनपा त्या भाड्याच्या उत्पन्नावर ५० टक्क्यांपर्यंत कर आकारते, हा सरळसरळ अन्याय आहे. मनपाच्या तिजोरीला जर भाड्याच्या उत्पन्नात वाटा हवा असेल, तर त्यांनी घर बांधण्यासाठी घेतलेल्या कर्जातही भागीदार व्हावे, अन्यथा भाडेआधारित कर आकारणी तातडीने रद्द करून मालमत्ता कराची आकारणी केवळ इमारतीच्या क्षेत्रफळावर करावी, अशी मागणी छिंदम यांनी केली.

वाढीव पाणीपट्टीच्या मुद्द्यावरून छिंदम यांनी प्रशासनाला धारेवर धरले. वर्षातील ३६५ दिवसांपैकी निम्मे दिवसही शहरात नियमित पाणीपुरवठा होत नाही. दूषित पाणी, कमी दाब आणि अनियमित सेवा यांमुळे नागरिक आधीच त्रस्त आहेत. कधी मोटार बंद, कधी पाईपलाईन फुटलेली, तर कधी वीज खंडित, अशी मनपाची अवस्था आहे. अशा परिस्थितीत पाणीपट्टी वाढवणे चुकीचे आहे, असे त्यांनी पत्रात नमूद केले.

### सभा तहकूब होण्याआधीच नगरसेवकांना निरोप

१५ मे रोजीच्या सर्वसाधारण सभेवेळी घडलेल्या नाट्यमय घडामोडींवर बोलताना छिंदम यांनी नगरसचिव मेहेर लहारे यांच्यावर गंभीर आरोप केला. छिंदम म्हणाले, मी सभेसाठी महापालिकेत आलो असता, उपमहापौरांच्या कार्यालयाजवळ नगरसचिवांनी नगरसेवकांना सभागृहात जाण्यापूर्वीच सभा तहकूब झाली असे सांगून त्यांची दिशाभूल केली. त्यानंतर महापौरांनी सभागृहात जाऊन संख्याबळ पुरेसे नसल्याचे (कोरम अभावी) सांगत सभा अधिकृतपणे तहकूब केली. हा सर्व प्रकार संशयास्पद आहे, असेही छिंदम यांनी म्हटले आहे.

# भिंगार वेस येथील वाहतूक कोंडीचा प्रश्न ऐरणीवर; कायमस्वरूपी पोलीस कर्मचाऱ्याच्या नियुक्तीची मागणी

नगर – भिंगार वेस परिसरात दिवसेंदिवस वाढत चाललेल्या वाहतूक कोंडीमुळे नागरिकांचे हाल होत असून, या समस्येवर तातडीने उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी भिंगार येथील राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी आमदार संग्राम जगताप यांच्या वतीने केली आहे. वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी भिंगार वेस चौकात कायमस्वरूपी पोलीस कर्मचाऱ्याची नियुक्ती करण्यात यावी, या मागणीचे निवेदन शहर वाहतूक शाखा तसेच भिंगार कॅम्प पोलीस स्टेशनला देण्यात आले. याप्रसंगी भिंगार शहराध्यक्ष संजय सपकाळ, युवकचे भिंगार शहराध्यक्ष शिवम भंडारी, संपत बेरड, अनिल तेजी, सुदाम गांधले, दीपक लीपाने, अजिंक्य भिंगारदिवे, सागर चवंडके, दिनेश लंगोटे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

भिंगार वेस हा परिसर हा अहिल्यानगर शहराला जोडणारा अत्यंत वर्दळीचा भाग मानला जातो. येथे सतत वाहनांची मोठ्या प्रमाणात ये-जा सुरू असते. मात्र वाहतूक नियंत्रणासाठी पुरेशी व्यवस्था नसल्याने वारंवार वाहतूक कोंडी निर्माण होत असून नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला, प्रवासी तसेच दुचाकी व चारचाकी वाहन चालकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत असल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, भिंगार वेस परिसरातील वाहतूक परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर बनत चालली आहे. १२ मे रोजी या ठिकाणी झालेल्या प्रचंड वाहतूक कोंडीमुळे एका रुग्णवाहिकेलाही अडकून पडावे लागले होते. परिस्थिती इतकी बिकट झाली होती की, रुग्णवाहिकेच्या चालकाला स्वतः वाहनातून खाली उतरून वाहतूक सुरळीत करण्याचा प्रयत्न करावा लागला. या घटनेमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त करण्यात आला असून, आपत्कालीन सेवांनाही वाहतूक कोंडीचा फटका बसत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

या वारंवार होणाऱ्या कोंडीमुळे आर्थिक नुकसानासह जीवितहानी होण्याची शक्यताही नाकारता येत नसल्याचे पदाधिकाऱ्यांनी निवेदनात म्हटले आहे. भिंगार परिसराचे योग्य नियोजन करून वाहतूक व्यवस्था सक्षम करण्याची गरज असून, भिंगारकरांचा वाहतूक कोंडीत अडकलेला श्वास मोकळा करण्यासाठी प्रशासनाने तातडीने पावले उचलावीत, अशी मागणी करण्यात आली आहे.

भिंगार वेस चौकात कायमस्वरूपी पोलीस कर्मचारी नियुक्त केल्यास वाहतुकीवर नियंत्रण ठेवणे सुलभ होईल आणि नागरिकांना मोठा दिलासा मिळेल, असा विश्वास शिष्टमंडळाच्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे. सदर मागणीचे निवेदन शहर वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक अन्सार शेख तसेच भिंगार कॅम्प पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक जगदीश मुलगीर यांना देण्यात आले.

### वाहतूक कोंडीत रुग्णवाहिका अडकल्याने नागरिकांमध्ये संताप



भिंगार वेस परिसरातील वाहतूक कोंडीच्या समस्येवर तातडीने उपाययोजना करण्यात याव्या, या मागणीचे निवेदन भिंगार येथील राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी आमदार संग्राम जगताप यांच्या वतीने शहर वाहतूक शाखा तसेच भिंगार कॅम्प पोलीस स्टेशनला दिले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

